
अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड
www.surajyadigital.com | शुक्रवार, दि. १२ मे २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २२२ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८



# आता भवितव्य काय?

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या राज्यातील सत्ता संघर्षावर सुप्रीम कोर्टाकडून दिलेल्या निकालानंतर मराठी माणसाची उत्सुकता एकदाची संपली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे-उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सरकार वाचले. त्यामुळे मराठी माणसाने सुस्कारा टाकलेला असणार. कारण राज्यावर पुन्हा अस्थिरता येणार की काय? अशी भीती राज्यामधून व्यक्त व्हायला लागली होती. सामान्य नागरिकांना सरकार कुठल्याही पक्षाचे असो. ते स्थिर असायला हवे, असे त्याला वाटत असते. अस्थिरता निर्माण झाली की-लोकांचे प्रश्न बाजूला पडता.सरकारी योजना प्रलंबित राहात असतात आणि प्रशासन ढिम्म रहाते.कोर्टाच्या निकालावर आता राजकीयदृष्ट्या सत्ताधारी आणि विरोधक यांच्यात काथ्याकूट होत राहील. नैतिकेच्या गप्पा ठोकल्या जातील.आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या जातील. आचचेच किती खरे आहे हे छाती फुगवून सांगायला लागतील.हे होतच राहाणार आहे कारण त्यांना राजकारण करायचे असते पण कोर्टाच्या निकालातून ज्या काही बाबी समोर आल्या आहेत,त्या पाहाता एक चूक किती महागात पडते हे स्पष्ट झाले आहे.माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सभागृहात बहुमताला समोरे न जाताच राजीनामा दिल्यामुळे सारा खेळ खल्लास झाला. राजीनामा दिल्याने आघाडीचे सरकार गडगडले.त्यानंतर शिंदे-फडणवीस यांनी बहुमताच्या जोरावर सरकार स्थापनेचा दावा केला. तत्कालिन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांनी रितसर त्यांना बहुमत सिद्ध करायला सांगितले आणि शिंदे यांनी बहुमतात बाजी मारली.कारण तितका आकडा त्यांच्याकडे होता.या प्रसंगातून कर्नाटकातील एका राजकीय घडामोडीची आठवण आल्याशिवाय राहात नाही.२०१८मधील कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत कुणालाच स्पष्ट बहुमत मिळाले नव्हते.भाजपाला सत्तेपासून रोखण्यासाठी काँग्रेस आणि जेडीएस हे समविचारी पक्ष एकत्र आले. काँग्रेस सर्वात मोठा पक्ष असतानाही मुख्यमंत्रीपद जेडीएसला देवून टाकले.सत्तेत कोण कुठला पक्ष एकत्र याला याला काडीचीही किंमत नाही.सत्तेसाठी केवळ बहुमताचा आकडा लागतो.ठाकरे



यांच्या शिवसेनेतून ४० आमदारांनी बंड केले आणि ठाकरेंच्या नेतृत्वावर हरकती घेतल्या. आम्ही पक्ष बदलला नाही तर पक्षातील नेतृत्व अमान्य केले आहे,असे शिंदे त्यावेळी म्हणाले होते.त्यात गैर काहीच नव्हते. आमदार सोडून गेल्यामुळे ठाकरे अल्पमतात आले. त्यामुळे त्यांना राजीनमा द्यावा लागला,यात शंकाच नाही.त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे आणि काँग्रेसचे नेते गप्प बसून राहिले.ठाकरे राजीनामा देणार हे त्यांना ठाऊक नव्हते,असे होवूच शकणार नाही. नवीन सरकार आल्यानंतर काँग्रेसचे नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी हळूच एक पिल्लू सोडला.ठाकरे यांनी राजीनामा देवून मोठी चूक केली,असे चव्हाण म्हणाले.त्यांची वाणी खरी ठरली पण उशीराने हे वक्तव्य करणे म्हणजे बैल गेला,झोपा केला,अशातला हा प्रकार ठरतो.आघाडीचे शिल्पकार शरदराव परवा परवा म्हणाले की- ठाकरे यांनी राजीनामा देण्यापूर्वी चर्चा करायला हवी होती.आघाडी करताना शरदराव यांनी संजय राऊत यांना कवेत घेतले.आज तेच शरदराव राऊतांवर तुटून पडत आहेत.राजकीय नेते सरड्याप्रमाणे रंग कसे बदलतात याचा एक उत्तम नमुना म्हणून त्याकडे पाहाता येईल. ठाकरे राजीनामा देत असताना दोन काँग्रेसच्या नेत्यांनी बाळगलेले मौन म्हणजे जातायेत जर जावू द्या,अशी त्यांची भूमिका होती की काय? मुळात काँग्रेसला शिवसेनेसोबत आघाडी करायचीच नव्हती. केवळ शरदराव यांनी गळ घातल्याने मॅडम तयार झाल्या.त्यामुळे राज्यातील काँग्रेसच्या नेत्यांना तोंडावर बोट ठेवावे लागले.आता खरी गंमत पुढे आहे.शिंदे सरकार टिकले.ठाकरे यांच्या हातून शिवसेना देखील निघून गेली आहे.त्यामुळे आघाडी टिकणार काय? हा खरा प्रश्न आहे.सभागृहाचा अधिकार सभापतींना असतो.त्यांचया अधिकारात हस्तक्षेप न करण्याची कोर्टाची भूमिका लोकशाहीची बजू राखणारी आहे.सभापती राहुल नार्वेकर यांना अपात्रतेविषयीचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे.आता व्हिप विषयी कायदे तज्ञ नसते प्रश्न उपस्थित करत आहेत.आयोगाने शिवसेना शिंदे गटाचीच असल्याचा निर्वाळा दिल्यामुळे शिंदे हे स्वस्थ कसे बसतील.सत्ता कुठलाही निर्णय कसाही फिरवू शकते.व्हिपबाबत लगेच प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.ठाकरेंकडे उरले-सुरले आमदारही शिंदे गटाला जावून मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.आयोगाच्या निर्णयामुळे शिंदेंना व्हीप बजावण्याचा अधिकार मिळाला आहे.आता ठाकरे गटाचे भवितव्य काय? हा खरा प्रश्न आहे.

---

परिचारिका दिन

# फ्लॉरेन्स नाइटिंगेल : द लेडी विथ डेटा !

*फ्लॉरेन्स नाइटिंगेल यांचा जन्म इटलीतील फ्लॉरेन्स येथे १२ मे १८२० रोजी एका समृद्ध आणि उच्चवर्गीय ब्रिटिश परिवारात झाला. त्यांचे शिक्षण घरीच झाले. त्यांच्या वडिलांनी त्यांना ग्रीक, लॅटिन,फ्रेंच, जर्मन,व इटालियन या भाषाशिवाय इतिहास, तत्वज्ञान व गणित हे विषय शिकविले. नाइटिंगेल यांना लहानपणापपासूनच गणितात गती होती. पुढे आयुष्यभर त्यांनी विविध भाषांचा अभ्यास चालू ठेवला. अतिशय सुखवस्तू घराण्यात जन्म होऊनही परमेश्वराने आपल्याला भूतदयेसाठी व मानवतेची सेवा करण्यासाठीच जन्माला घातले अशा भावनेने त्या प्रेरित झाल्या होत्या. तथापि, रुग्णालयात जाऊन रुग्णपरिचर्या शिकावी या त्यांच्या इच्छेला तीव्र विरोध झाला व संसदेच्या कामकाजाचे वृतांत अभ्यासावेत,असे सुचविण्यात आले. मात्र पुढील तीन वर्षात त्या सार्वजनिक आरोग्य व रुग्णालये या विषयातील तज्ञ म्हणून गणल्या जाऊ लागल्या. १८५० साली जर्मनीमधील कैसरव्हर्ट येथील एका संस्थेत दाखल झाल्या आणि त्यांनी रुग्ण परिचर्या विषयक संपूर्ण अभ्यासक्रम पूर्ण केला. १८५३ मध्ये लंडनच्या इन्स्टिटयूशन फॉर द केअर ऑफ सिक जंटलविमेन इन डिस्ट्रेसड सरकमस्टन्सेस या छोट्या रुग्णालयात त्या अधिक्षक म्हणून रुजू झाल्या.*

क्रिमिया येथील कार्य- १८५४ मध्ये ब्रिटन, फ्रान्स, सार्डेनिया, तुर्कस्तान या देशांबरोबर रशियाचे क्रिमिया येथे युद्ध सुरू झाले. त्यावेळी ब्रिटिश मंत्रिमंडळातील युद्ध सचिव सिडनी हर्बर्ट यांनी नाइटिंगेल यांच्या कार्याचे महत्व लक्षात घेऊन त्यांना युदधभूमीकडे जण्याविषयी सुचविले. तेथे त्यांच्यावर तुर्कस्तानातील सर्व सैनिकी रुग्णालयातील रुग्णपरिचर्या विषयक व्यवस्थेची सोपवलेली जबाबदारी त्यांनी चोखपणे पार पाडली. तेव्हा तुर्कस्तानला जखमींची सेवा करण्यासाठी ३८ स्त्रियांचे एक पथक पाठविले होते. यावेळी डॉक्टर सैनिकांना तपासून गेल्यानंतर रात्रीच्या अंधारात मेंणबत्तीच्या प्रकाशात त्या जखमी सैनिकांची सेवा करीत असत. त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना लेडी विद द लैंप' या उपाधी ने सम्मानित करण्यात आले. मात्र युद्धात जखमी झालेल्या सैनिकांची सेवा करताना झालेल्या संसर्गाने त्यांना गाठले. १८५५ साली उरस्कूदार रुग्णालयात पटकी व प्रलापक सन्निपात ज्वर (टायफस ज्वर) यांची उद्भवलेली मोठी साथ त्यांनी अथक प्रयत्नांळनी आटोक्यात आणली. ब्रिटिश सैनिकांचे आरोग्य, निवारा व अन्न यात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्यांनी अविरत परिश्रम घेतले. याबाबतीत परदेशी शासन यंत्रणा देखील त्यांचा सल्ला घेत असत. ब्रिटिश जनतेने उभा केलेल्या नाइटिंगेल निधीतून सेंट टॉमस रुग्णालयात नाइटिंगेल स्कूल फॉर नर्सेस ही स्त्रियांना रुग्णपरिचर्या विषयक शिक्षण देणारी जगातील पहिली संस्था स्थापन झाली.

संख्याशास्त्रातील योगदान- नाइटिंगेल यांना संख्याशास्त्राची गोडी होती. विविध प्रकारची आकडेवारी गोळा करून त्यातून निष्कर्ष काढण्यात त्यांना लहानपणापासूनच रस होता. तथापी,



तेव्हा ब्रिटनमध्ये महिलांना महाविद्यालयात प्रवेश दिला जात नसे. मात्र त्यांनी स्वतःच अभ्यास करून संख्याशास्त्रात प्राविण्य मिळविले आणि त्याचा त्यांनी आपल्या कार्यात उपयोग करून घेतला व लोककल्याण साधले. म्हणूनच त्यांना वैद्यकीय संख्याशास्त्राच्या संस्थापिका मानले जाते. आकडेवारीचे आलेखांच्या माध्यमातून दृश्य सादरीकरण करणे, हे त्याकाळात फारसे प्रचलित नव्हते. विल्यम प्लेफेअर यांनी विकसित केलेल्या पाय आकृती सारख्या आलेखांचा त्यांनी परिणामकारकपणे वापर केला. नाइटिंगेल यांचे संख्याशास्त्रातील सर्वात महत्त्वपूर्ण योगदान म्हणजे, त्यांनी विकसित केलेली ध्रुवीय क्षेत्र आकृती. या प्रकारच्या आलेखास नाइटिंगेल रोझ प्लॉट' असेही म्हटले जाते. ही रेखाकृती आधुनिक वृत्तीय आयतकृतीचे (सरक्यूलर हिस्टोग्राम) किंवा पाय डायग्राम चे पूर्वरूप आहे. हिस्टोग्राम हे वंटण फलनाचे (डिस्ट्रिब्यूशन फंक्शन) आयताकृतीद्वारे केलेले निदर्शन आहे. निरीक्षित मूल्यांची ज्या अंतरालामध्ये (इंटरव्हल) विभागणी केलेली असते, ते अंतराल आयताच्या रुंदीने तर प्रत्येक अंतरालात घडणाऱ्या निरीक्षणांची संख्या आयताच्या ऊंची ने दर्शविली जाते. आशा रेखाकृतींच्या संकलनाला त्यांनी कॉक्सकोम्ब' हे नाव दिले होते. पारंपरिक शाब्दिक संख्याशास्त्री अहवाल समजू न शकणाऱ्या अधिकारी आणि सांसदासाठी त्यांनी या कॉक्सकोम्ब' चा व्यापक उपयोग केला. त्यांच्या सन्मानार्थ या आलेखाला नाइटिंगेल कॉक्सकोम्ब' म्हंटले जाते. स्वतः काम करीत असलेल्या लष्करी रुग्णालयातील दर महिन्यातील मृत्यूंची संख्या व कारणे यांचे सादरीकरण करण्यासाठी त्यांनी या आकृतीचा उपयोग केला. एरवी आकडेवारीच्या जंजाळामुळे संसद सदस्य आणि सरकारी अधिकारी यांच्याकडून असे अहवाल दुर्लक्षित राहात असत. तथापि, नाइटिंगेल यांनी केलेल्या प्रभावशाली दृश्य सादरीकरणामुळे सैनिकांसाठीच्या वैद्यकीय सुविधा किती अपुऱ्या आहेत याची जाणीव होऊन या वैद्यकीय सुविधांचा दर्जा सुधारण्याचे प्रयत्न सुरु झाले. फ्रान्सिस् गाल्टन आणि कार्ल पिअर्सन या संख्याशास्त्रज्ञांना प्रभावित करून उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमामध्ये उपयोजित संख्याशास्त्र' हा नवा शब्दप्रयोग त्यांनी अंमलात आणला. त्यानंतर १९११ मध्ये युनिव्हर्सिटी कॉलेज, लंडन येथे उपयोजित संख्याशास्त्र विभाग सुरू करण्यात आला.

नाइटिंगेल यांनी लेखनही केले असून त्यांचा नोटस ऑन नर्सिंग' (१८६०) हा नावाजलेला ग्रंथ आहे. तर नोटस ऑन मॅटर्स अफेकटींग द हेल्थ, एफिशियन्सी अँड हॉस्पिटल ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ दी ब्रिटिश आर्मी' हा त्यांचा मोठा ग्रंथ १८५८ साली प्रसिद्ध झाला आहे. १८८३ साली राणी व्हिक्टोरिया ने त्यांना रॉयल रेड क्रॉस पुरस्काराने सन्मानित केले. याशिवाय, १९०७ मध्ये त्यांना ब्रिटिश सरकारकडून ऑर्डर ऑफ मेरिट' हा किताब बहाल करण्यात आला. असा किताब मिळविणाऱ्या त्या पहिल्याच महिला होत्या. त्यांच्या हातातील कौशल्य व वैज्ञानिक दृष्टिकोनातून रूग्णसेवा केल्यामुळेच परिचर्याशास्त्राला नवीन दिशा मिळाली. त्यांच्या आधी आजारी जखमींच्या उपचारावर फारसे लक्ष दिले जात नसे, परंतु नाइटिंगेल यांनी हे चित्र पार बदलून टाकले. १३ ऑगस्ट १९१० रोजी, वयाच्या ९० व्या वर्षी त्यांचे लंडन येथे निधन झाले. त्यांच्या स्मृतिस विनम्र अभिवादन !

**-प्रा. विजय कोष्टी**

---

साखर उद्योग

# उसाची एफआरपी एकरकमी नाही, दोन टप्प्यात

पूर्वी साखर कारखाने सी मोलसिस पासून प्रक्रिया करायचे, ज्याचा साखरेच्या उताऱ्यावर परिणाम होत नव्हता. केंद्र सरकारच्या नवीन महत्त्वाकांक्षी धोरणाप्रमाणे २०२५ पर्यंत २०% इथेनॉल मिश्रणाचे उद्दिष्ट ठेवले आहे. त्यामुळे भारतातील इथेनॉल उत्पादन क्षमता सध्याच्या ७०० वरून १५०० कोटी लिटर पर्यंत वाढणार आहे. देशाची दरवर्षी ३०,००० कोटी रुपयांच्या परकीय चलनाची बचत होणार आहे. त्यामुळे कारखान्यांनी प्रक्रियेत बदल करून बी हेवी मोलसिस, उसाचा ज्यूस/ सिरप किंवा दोन्ही पासून इथेनॉल निर्मिती सुरू केली आहे. काहींनी स्टँड अलोन युनिट उभारले आहेत. मे २०२२ च्या आकडेवारीनुसार महाराष्ट्रात एकूण आसवानीचे ११७ व इथेनॉलचे ११५ प्रकल्प उभारले आहेत.

ज्या कारखान्यांनी आपल्या उत्पादनामध्ये कुठल्या उपपदार्थापासून इथेनॉल बनवले आहे व त्या उत्पादनाचा किती टक्के भाग त्यासाठी वळवला आहे, ही कारखान्याच्या आतील तांत्रिक बाब बाहेर ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कळत नाही. उदाहरणात बी - हेवी मळीपासून इथेनॉल उत्पादन केल्यास अंदाजे १.३ ते १.५ % इतकी साखर उताऱ्यात घट होऊ शकते. हे आपल्याला माहिती असणे गरजेचे आहे. कारण या प्रक्रियेमुळे साखरेच्या रिकव्हरीमध्ये घट होत असते. म्हणून शेतकऱ्यांची हित जपण्यासाठी केंद्राने व साखर आयुक्तालयाने परिपत्रक काढून असे निर्देश दिले आहेत की- ती सदर रिकव्हरीतील घट कारखाना निहाय किती आहे हे वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूट नॅशनल शुगर इन्स्टीट्युट, कानपूर किंवा तत्सम शासनमान्य संस्थेकडून प्रमाणित करून घेणे आवश्यक आहे. त्यानुसार असे बंधनकारक आहे की, साखर कारखान्यांनी गाळप हंगाम संपल्यानंतर त्यांनी कुठल्या पदार्थापासून व उत्पादनाचा किती भाग इथेनॉल निर्मितीसाठी वळवला आहे, हा तपशील पंधरा दिवसांच्या आत व्हिएसआयला कळवावा व त्यांच्या कडून उताऱ्यामध्ये किती घट आहे हे प्रमाणिकरण करून घेणे आवश्यक आहे.

साखर कारखान्याने जाहीर केलेली रिकव्हरी : ९.६४ %



नियमाप्रमाणे शेतकऱ्यांना ऊस पुरवठा केल्यापासून १४ दिवसात ऊस दराची रक्कम मिळण्याचा हक्क आहे. २०२२-२३ च्या आक्टोबर-नोव्हेंबर गाळप हंगामापासून, नवीन धोरणाप्रमाणे बेसीक रिकव्हरी १०.२५ % प्रमाणे शेतकऱ्यांना एक रकमी एफआरपी मिळणार. पण गाळप हंगाम संपल्यानंतर वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटने केलेल्या सर्टिफिकेट प्रमाणे सुधारित उतारा पुढील प्रमाणे आहे. (ह्याचे कॅल्क्युलेशन सूत्र फार क्लिष्ट असल्यामुळे इथे देत नाही).ज्या साखर कारखान्याने बी हेवी मळी पासून इथेनॉल निर्मिती केल्यामुळे साखर रिकव्हरीतील घट : १.३०२ %. ज्या साखर कारखान्याने थेट उसाच्या रसापासून किंवा शुगर सिरप (साखर पाक) पासून इथेनॉल निर्मिती केल्यामुळे साखर रिकव्हरीतील घट : १.०५५. शासनाच्या निर्देशाप्रमाणे अंतिम उतारा: (९.६४+१.३०२+१.०५५)= ११.९९७ %

त्यामुळे आता ह्या वाढीव उताऱ्याप्रमाणे, फरकाची जादा रक्कम शेतकऱ्यांना प्रीमियम म्हणून दुसऱ्या हप्त्यात देणे बंधनकारक आहे. अर्थात त्यामध्ये त्याच हंगामाची ऊसतोडणी व वाहतुकीचा खर्च वजा करुन कारण बदललेल्या परिस्थितीमध्ये साखर उतारा हंगाम संपल्यानंतरच अचूकपणे काढता येतो. केंद्र सरकारच्या अधिसूचने नुसार संबंधित साखर कारखान्याचे गाळप हंगाम संपल्यानंतर त्या हंगामाचा साखर उतारा ३० दिवसाच्या आत निश्चित करणे बंधनकारक आहे. त्याप्रमाणे शेतकऱ्यांना वाढीव रक्कम दुसऱ्या टप्प्यात मिळावी अशी ती तरतूद आहे. कार्यकर्त्यांनी व ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी ह्या बाबत जागरूक राहणे आवश्यक आहे.

कारखाने गाळप चालू असेपर्यंत सिरप किंवा बी हेवी मळीपासून इथेनॉल निर्मिती करतात व नंतर ऑफ सिझन मध्ये साठलेल्या मोलॅसिस पासून इथेनॉल करतात.आम्ही अशी मागणी करीत आहोत की, या व्यवहारात पारदर्शकता आणण्यासाठी प्रत्येक कारखान्याने वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटने दिलेले वरील सर्टिफिकेट कारखान्याच्या नोटीस बोर्डावर लावावे.

सध्याच्या प्रचलित पद्धतीमध्ये रंगराजन समितीच्या शिफारसीनुसार, कारखानाच्या साखर विक्री मुल्याच्या ७५% किंवा साखर व प्राथमिक उप पदार्थाच्या म्हणजेच मळी, भुसा आणि प्रेसमड विक्रीच्या ७०% जे जास्त आहे तो त्या कारखान्याचा आर एस एफ दर असतो. व तो जर एफआरपी पेक्षा जास्त निघत असेल तर तोच देय होतो. पण बदललेल्या परिस्थितीनुसार मळीची घट होऊन, विक्री न करता साखर कारखाने इथेनाल निर्मिती करीत आहेत. त्यामुळे सध्याचे सूत्र हे कालबाह्य आहे. त्यात बदल करणे आवश्यक आहे. अजून एक मुद्दा हा आहे की बरेच वेळा कारखाने त्यांच्या कडे अतिरिक्त पडून राहिलेल्या साखरेच्या साठ्यांपासून इथेनॉल तयार करतात. याबाबतची नोंद शेतकऱ्यांना मिळणाऱ्या रकमेमध्ये गृहीत धरावी लागेल. ह्याचा कुठेही उल्लेख आलेला नाही किंवा वसंतदादा साखर संशोधन संस्थेच्या प्रामाणिकरणमध्ये दाखवलेले नाही. साधारणपणे एक टन साखर उत्पादन हे ६०० लिटर इथेनॉल च्या बरोबर आहे.

व्हीएसआयच्या वार्षिक अहवालामध्ये असे लिहिले आहे की त्यांनी २०१९-२० च्या गाळप हंगामामध्ये फक्त २३ कारखान्यांचे 'रिकव्हरी घट' सर्टिफिकेशन केले आहे. बाकीच्या कारखान्यांनी, ज्यांनी इथेनॉल तर प्रकल्प उभारले आहेत, त्यांनी त्या सीझनमध्ये ते कार्यान्वित केले नव्हते का, हे पाहावे लागेल.

**- सतिश देशमुख**

---

विचार

# जगातील सर्वात शक्तिशाली गोष्ट कोणती?

जो जन्माला आला आहे त्याला मरण निश्चित आहे, मग तो माणूस असो, देव असो, प्राणी असो, पक्षी असो, सर्वांना मरावे लागते. ग्रह-नक्षत्रांचे वयही ठरलेले असते आणि आपल्या या सूर्याचेही. पुनर्जन्म ही संकल्पना फक्त भारतातील धर्मांमध्ये आढळते तर पश्चिमेकडील धर्म हे तत्त्व पाळत नाहीत. पण प्रश्न असा आहे की मृत्यूनंतर पुनर्जन्म आहे का आणि

शेवटी पुनर्जन्म म्हणजे काय?

उपनिषदांच्या मते, जर एखाद्या क्षणाला अनेक भागांमध्ये विभागले तर त्यापेक्षा कमी वेळात, आत्मा एक शरीर सोडून लगेच दुसरे शरीर धारण करते. हा सर्वात कमी कालावधी आहे. कमाल वेळ कालावधी ३० सेकंद आहे. परंतु पुराणानुसार हा काळ दीर्घ कालावधीचा, ३ दिवस, १३ दिवस, सव्वा महिना किंवा सव्वा वर्षाचा असू शकतो. जर आत्मा नवीन शरीर धारण करण्यास सक्षम नसेल तर मोक्षासाठी पृथ्वीवर भटकत असते, स्वर्गात जाते, पितृलोकात जाते किंवा पाताळात पडून वेळ घालवते.

पुन: अवतार म्हणजे सूक्ष्म शरीर धारण करताना आत्मा आणि स्थूल शरीर यांच्यातील संबंध पुन्हा पुन्हा निर्माण होणे आणि तोडणे. याचे उत्तर जन्माच्या उत्तरातच दडलेले आहे. किंबहुना सूक्ष्म शरीर आणि स्थूल शरीर यांचा संबंध प्रस्थापित झाला आहे, त्याचा संबंध तोडणे म्हणजे मृत्यू आणि जोडणे म्हणजे पुनर्जन्म होय. कर्म आणि पुनर्जन्म हे एकमेकांशी संबंधित आहेत. पुनर्जन्म हे कर्माचे फळ भोगण्यासाठीच होतो आणि पुनर्जन्मामुळे नवीन कर्म जमा होतात. अशा प्रकारे पुनर्जन्माचे दोन उद्दिष्टे आहेत - प्रथम मनुष्याने त्याच्या जन्माच्या कर्माचे फळ भोगावे जेणेकरून तो त्यापासून मुक्त होईल. दुसरे म्हणजे या उपभोगांचा अनुभव घेतल्यानंतर तो नवीन जीवनात त्या सुधारण्यासाठी उपाय करतो ज्यामुळे आत्मा पुन्हा-पुन्हा जन्म घेऊन सतत वाढत राहते आणि शेवटी संपूर्ण कर्मांनी जीवनाचा नाश करून मुक्तीची स्थिती प्राप्त करते.

---

जनमानस

# मुलींना सुरक्षा देण्यासाठी अनेक उपाय करण्याची गरज

देशात व महाराष्ट्रात मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण खूपच मोठे आहे. जानेवारी ते मार्च २०२३ या काळात सुमारे ५ हजार मुली बेपत्ता आहेत. गुजरात मधील संख्या तर प्रचंड आहे ते राज्य देशात प्रथम क्रमांकावर आहे, तर महाराष्ट्र दुसऱ्या क्रमांकावर आहे दररोज सरासरी ७० मुली बेपत्ता होत आहेत .देशाच्या इतर राज्यातही ही संख्या मोठ्या प्रमाणात असावी मुलींना बेसावधपणे फसविले जाते . त्यांना वेगवेगळ्या प्रकारची आमिषे दाखविली जातात मुलींना अशा कामात लावणाऱ्या काही टोळ्या सुद्धा असण्याची शक्यता आहे .प्रेमभंग किंवा विवाहित असूनही दुसऱ्या व्यक्तीशी प्रेम या कारणामुळे सुद्धा मुली बेपत्ता होत आहेत देशातील गरिबी व शिक्षणाचा अभाव ही सुद्धा कारणे आहेत मुली बेपत्ता झाल्यानंतर



त्यावर तपास करून अशा लोकांना कठोर शिक्षा करावयास हवी. अजूनही काही भागात शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. ते वाढवावयास हवे मुलींना योग्य ते प्रशिक्षण देऊन त्यांना कोणत्याही प्रसंगाला सामोरे जाण्याची ताकद द्यावयास हवी . सरकारने सुद्धा मुली का पळून जातात किंवा त्यांना नेले जाते ? याच्याही कारणांची मीमांसा करावी . यामध्ये मुख्यत्वे अल्पवयीन मुलींचा समावेश असावा . मुलींच्या अपहरणासंबंधी वेगळे कायदे सुद्धा असण्याची जरुरी आहे प्रेमभंग किंवा त्यासंबंधीच्या तक्रारी यामध्ये पालकांनी लक्ष घातले पाहिजे .आजकाल मुलींचा वावर नोकरी निमित्ताने सर्व क्षेत्रात वाढला आहे . त्याचा गैरफायदा कोणी घेऊ नये . या दृष्टीने पावले उचलली पाहिजेत .काही मुली नोकरी व शिक्षणासाठी परदेशात सुद्धा जातात . त्याची सुद्धा जाताना कसून तपासणी करणे जरुरीचे आहे . त्यांना फूस लावून नेले जात आहे का ? हे पहावयास हवे एकूणच या प्रश्नावर सरकार व समाजधुरीण यांनी मोठी जनजागृती करण्याची गरज़ आहे

**- शांताराम वाघ पुणे**

---

*द काश्मीर फाइल्स'प्रमाणेच द केरळ स्टोरी' या चित्रपटाला डोक्यावर उचलून घेताना सध्या बघायला मिळत आहे. मुळात कसलाही गाजावाजा न करता अगदी गुपचूप प्रदर्शित केलेल्या या एका ट्रेलरमुळे पुन्हा सोशल मीडियावर आपल्याला दोन गट पडल्याचे पाहायला मिळत आहे. सोशल मीडियाच कशाला तर बाहेरही तीच परिस्थिती आहे. काही धार्मिक संघटना या चित्रपटासाठी खास शो आयोजित करीत असून फुकट जनतेला हा चित्रपट दाखवण्यात येणार आहे तर काही ठिकाणी अगदी सामान्य लोकसुद्धा या चित्रपटाकडे धर्माच्या चष्म्यातूनच बघत आहेत. पण या चित्रपटाचा मूळ मुद्दा हा खूप मोठा आहे ज्याबद्दल क्वचितच कोणाला ठाऊक असेल. द काश्मीर फाइल्स' अन् या चित्रपटात बरेच अंतर आहे आणि हे अजूनही बऱ्याच लोकांच्या ध्यानात येत नाहीये.*

# हे सत्य माहीत आहे का?

द केरळ स्टोरी'च्या टीझर ट्रेलरमधून एका हिंदू मुलीची कथा मांडण्यात आली आहे. जिचे जबरदस्ती धर्मपरिवर्तन करून इसिस या आतंकवादी संघटनेत सामील करण्यात आले. त्यानंतर तिला अफगाणिस्तान, इराक, सीरिया येथे नेण्यात आले आणि आता तिच्या घरवापसीबद्दल हा चित्रपट भाष्य करणार असल्याचे दिसत आहे. याबरोबरच चित्रपटातून लव्ह जिहाद, केरळ राज्याबद्दलचे बरेच तर्क-वितर्क, धार्मिक टिप्पणी आणि द्वेष आणि इतर आंतरराष्ट्रीय राजकारण पाहायला मिळत आहे. ही झाली चित्रपटाची गोष्ट, पण सत्य परिस्थिती यापेक्षा थोडी वेगळी आहे.

खरे तर हा चित्रपट आयसीस ब्राइड्स'वर बेतलेला आहे. २०१४ ते २०१७ या कालखंडात केवळ भारतातूनच नव्हे तर काही युरोपियन देश आणि साऱ्या जगभरातून बऱ्याच महिलांनी आयसीस'मध्ये सामील व्हायचा निर्णय घेतला. हा निर्णय त्यांनी स्वतःच्या मर्जीने घेतला होता. याचे कित्येक पुरावे लिखित आणि व्हिडीओ




स्वरूपात जगभरातील कित्येक सुरक्षा संस्थांकडे उपलब्ध आहेत. या महिलांचे धर्मपरिवर्तन करून त्यांना नंतर अफगाणिस्तान, सीरिया, इराक, इराण अशा ठिकाणी नेण्यात आले. या स्त्रियांना नंतर तिथेच मुलेदेखील झाली. २०१९ मध्ये जेव्हा बगदादीसह इतर प्रमुख अतिरेक्यांना जेव्हा मारण्यात यश आले तेव्हा या अतिरेक्यांच्या पत्नी आयसीस ब्राइड्स' म्हणून ज्यांना ओळखले जाते त्यांनी अफगाणिस्तानमध्ये शरण पत्करली अन् तेव्हाच्या तिथल्या सरकारने त्यांना तुरुंगात टाकले.

यानंतर जेव्हा तालिबानने अफगाणिस्तानवर ताबा मिळवला त्या वेळी त्यांनी तुरुंगातील सगळ्या कैद्यांना सोडून दिल्याचे आपल्या लक्षात असेलच. त्यामध्ये या महिलादेखील होत्या अन् त्यानंतर त्यांनी आपापल्या देशात परतायचा प्रयत्न सुरू केला. आजही भारतात अशा बऱ्याच केसेस सुरू आहेत, ज्याची माहिती वृत्तपत्रे, प्रसारमाध्यमे यांच्या माध्यमातून मिळत असते. भारतीय आणि खासकरून केरळमधील काही महिलांनी पुन्हा भारतात यायचा प्रयत्न केला. त्या वेळी आपल्या सुरक्षा संस्थांनी त्यांची कसून चौकशी केली आणि त्या चौकशीदरम्यान असे लक्षात आले की या महिला या कट्टर विचारांनी ग्रासलेल्या आहेत, त्यामुळे यांना पुन्हा आपल्या देशात घेणे हे सुरक्षेसाठी अत्यंत घातक आहे. त्यामुळे या अशा बऱ्याच केसेस अजूनही कोर्टात सुरू आहेत. अद्याप आपल्या सरकारचा निर्णय तोच आहे. केवळ भारतातच नव्हे तर इतरही बऱ्याच देशांमधील सुरक्षा संस्थांनी या महिलांना पुन्हा आपल्या देशात परत घेण्यास नकार दिला आहे. या एकूणच प्रकरणावर एक स्वीडिश वेब सीरिज कॅलिफेट' नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे, जी या विषयावर अत्यंत विस्तृतपणे भाष्य करते, पण द केरळ स्टोरी'मधून याच कट्टरपंथी, आयसीसशी जोडलेल्या महिलांप्रति सहानुभूती निर्माण करायचा प्रयत्न होत आहे, असे किमान याच्या टीझर ट्रेलरवरून तरी स्पष्ट झाले आहे. अर्थात हे सगळे तर्क आहेत, चित्रपट नेमका कसा असेल, त्यात काय दाखवणार आहेत हे पाहिल्याशिवाय आपण काहीच बोलू शकत नाही.

कसलाही आगापिछा न जाणून घेता केवळ धर्माची पट्टी डोळ्यांवर बांधून एखाद्या चित्रपटाला डोक्यावर घेणे हे आपल्या देशाच्या भवितव्यासाठी घातक आहे.

**- अखिलेश नेरलेकर**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

शुक्रवार, दि. १२ मे २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २२२ वा किंमत : ५ रुपये ▸ पान ३

## अनगर येथे घरफोडी; साडेपाच लाखांची लूट

**मोहोळ** : अनगर (ता . मोहोळ) येथे घरातील फर्नीचर सह भांडी सोने असा साडेपाच लाख रुपयांचे साहित्य चोरट्यांनी सायंकळच्या सुमारास चोरून नेले. ही घटना २ मे च्या रात्री घडली असून याबाबत ची फिर्याद मात्र ११ मे रोजी मोहोळ पोलिसांनी दाखल केली आहे.

उज्वला महादेव थिटे व त्यांचा मुलगा जयवंत याचे सह त्या अनगरमध्ये राहून शेती करतात व शेतीवर त्यांच्या कुटुंबाची उपजीविका चालते. २ मे रोजी कामानिमित्त त्या सोलापूर येथे गेल्या होत्या. तेथे असताना रात्री सव्वा आठ वाजता सुमारास गावातून त्यांना समजले की कोणीतरी अज्ञात लोक त्यांच्या घरातील साहित्य घेऊन जात आहे. त्यामुळे ३ मे रोजी सकाळी घेऊन पोलीस कर्मचारी घेऊन त्यांनी अनगर येथे जाऊन पाहिले असता घराची कडी कोयंडा तुटलेला होता. आत जाऊन पाहिले असता घरातील साहित्य आणि सोन्याचा ऐवज असा ५ लाख ४३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. या घटनेची फिर्याद ११ मे रोजी दाखल करण्यात आली या घटनेचा तपास मोहोळ पोलीस करत आहेत.

# ठाकरे चुकले, शिंदे बचावले

## एका अविद्येने सारे 'अनर्थ' घडले



सुराज्य/विशेष प्रतिनिधी

**सत्तासंघर्षावर सुप्रीम कोर्टाच्या निकालातून महाराष्ट्रावरची अस्थिरतेची भीती दूर झाली आहे. कोर्टाने तत्कालिन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी यांच्या भूमिकेवर कडक ताशेरे मारले पण भाजपाच्या समर्थनावरून एकनाथ शिंदे यांना बहुमत सिद्ध करण्यास पाचारण करणे न्याय ठरते,असे निरीक्षण कोर्टाकडून नोंदवले गेले. त्यामुळे शिंदे सरकारला अभय मिळाले. बहुमताला सामोरे न जाता उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिल्यामुळे आता तेव्हाची पूर्वस्थिती पुन्हा निर्माण केली जाऊ शकत नाही,असा निर्वाळा कोर्टाकडून दिला गेल्याने न्यायालयीन लढाईत ठाकरे यांचा सपशेल पराभव झाला. ठाकरेंच्या या एका अविद्येने (राजीनामा) महाविकास आघाडीत मोठा अनर्थ घडला. त्या १६ आमदारांच्या अपात्रतेवर निर्णय घेण्याचा अधिकार सभापतींना असल्याचे कोर्टाने म्हटल्यामुळे ठाकरे गटाची नाडी राहुल नार्वेकर यांच्या हाती सापडली आहे.पण माझ्या व्हीपनुसारच अपात्रतेचा निर्णय घ्यावा लागेल, असे ठाकरे यांनी म्हटल्यामुळे येत्या काळात शिंदे व ठाकरे गट यांच्यात मोठा संघर्ष होण्याची चिन्हे आहेत.**

सत्तासंघर्षाचा निकाल शिंदेंच्या बाजूने लागला. कोर्टाने एकनाथ शिंदेंना दिलासा मिळाला. १६ आमदारांच्या अपात्रतेचे प्रकरण अध्यक्षांकडे वर्ग करण्यात आले. या निकालात देखील उद्धव ठाकरेंचा राजीनामा हा कळीचा मुद्दा ठरला. तसेच राज्यपालांच्या भूमिकेवर देखील ताशेरे ओढले आहेत. कोर्टाने नोंदवलेली काही निरीक्षणे महत्वाची ठरतात. दहाव्या सुचीनुसार राजकीय पक्षाचा व्हिप अतिशय महत्त्वाचा आहे. ठाकरे गटाचे व्हिप महत्त्वाचे होते. ठाकरे गटाचे व्हिप पाहणे गरजेचे होते. गोगावलेंची प्रतोद म्हणून नियुक्ती बेकायदेशीर आहे.

### कोश्यारींवर ताशेरे...

सुनावणी दरम्यान राज्यपालांच्या भूमिकेवर कोर्टाने ताशेरे ओढले होते. त्यानंतर पुन्हा निकालवाचनात राज्यपालांच्या निर्णयावर बोट ठेवले. अविश्वास प्रस्ताव आलेला नसताना राज्यपालांनी बहुमत चाचणीसाठी ठाकरे यांना बोलावणे गैर आहे. जर अध्यक्ष आणि सरकार अविश्वास ठरावाकडे दुर्लक्ष करत असतील कर राज्यपालांनी बहुमत चाचणी बोलवणे योग्य आहे तेही मंत्रिमंडळाला विश्वासात न घेता... पण या ठिकाणी राज्यपालांकडे मविआ सरकारवर प्रश्न उपस्थित करण्याचे कारणं नव्हते. आणि बहुमत चाचणीची गरज नव्हती. राज्यपालांनी केवळ पत्रावर अवलंबून रहायला नको होते, त्या पत्रात असा कुठेही ठाकरे सरकारकडे बहुमत नसल्याचा उल्लेख आला नाही,असे कोर्ट म्हणाले.

### खरी मजा पुढे आहे...

अपात्रतेचा चेंडू नार्वेकर यांच्या दालनात आल्याने आता सभापती म्हणून नार्वेकर यांची कस लागणार आहे. निवडणूक आयोगाच्या निर्णयाने शिवसेना शिंदे गटाच्या ताब्यात गेली आहे. ठाकरे यांच्याकडे पक्ष नाही वा चिन्हही. तेव्हा ठाकरे यांना लागू करण्याचा अधिकार पोहचतो का? हा एक प्रश्न ऐरणीवर आला आहे.नार्वेकर यांची सभापतीपदावर झालेली निवड बेकायदा असल्याची चर्चा सुरू झाली आहे.कोर्टाने तत्कालिन स्थितीवर अपात्रतेविषयी सभागृहात प्रक्रिया करावी,असे म्हटल्याचे सांगितले जाते. त्यामुळे यदाकदा उपसभापती नरहरी झिरवळ यांच्याकडे अधिकार गेला तर ते कोणती जादू चालवणार हा एक नवा उत्सुकतेचा विषय झाला आहे. झिरवळ हे राष्ट्रवादी काँग्रेसचे आहेत. या साऱ्या गदारोळात किंगमेकर असणारे देवेंद्र फडणवीस हेही ऐनवेळी कोणती किमया करणार? याविषयीची उत्कंठा वाढली आहे.






# जागा नावावर कर म्हणत छळ ; माहेरी आलेल्या महिलेची सोलापुरात आत्महत्या

सुराज्य/सोलापूर

जागा नावावर कर म्हणत महिलेचा छळ केल्याने तिने माहेरी सोलापुरात येऊन गळफास घेऊन आत्महत्या केली. अर्चना ज्ञानेश्वर कोटा (वय-३८, रा.हैद्राबाद,तेलंगणा) असे त्या महिलेचे नाव आहे. यावेळी तिने सहा ते सात व्हिडिओ तयार करून त्यात आपल्या मृत्यूस तेलंगणातील बिल्डर कारणीभूत असल्याचे सांगितले आहे.

या प्रकरणी अर्चना यांची बहीण सुरेखा गोपीचंद सरवदे (वय-३३, रा. निलम नगर, आकाशवाणी केंद्र) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. नागराज यादव (रा.हैद्राबाद) यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

सुरेखाची बहीण मृत अर्चना या हैद्राबाद मध्ये राहण्यास होत्या. त्यांना त्यांच्या सासऱ्याने चार मिनार परिसरातील जागा बक्षीस स्वरूपात दिली होती.यातील १ हजार स्केअर फूट जागा त्यांनी आरोपी यादव यांना विकली होती. दुसऱ्या व्यवहारात आरोपीने व्यवहारातील रक्कम पूर्ण न देता न वटणारे चेक दिले. त्यानंतर अर्चना यांच्या पतीचे निधन झाले. दरम्यान, अर्चना या आरोपीच्या जागेमध्ये भाड्याने राहण्यास गेल्यानंतर आरोपीने त्यांना त्यांना त्रास दिले. ही बाब त्यांनी फिर्यादींना फोनमधून सांगितली. दरम्यान, १ मे रोजी त्यांनी आईकडे येऊन त्यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. यावेळी त्यांनी तेलगु भाषेत सहा ते सात व्हिडिओ तयार करत आपल्या मृत्यूस संबंधित बिल्डर असल्याचे सांगितले. या प्रकरणी आरोपी नागनाथ यादव याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा तपास सपोनि चौधरी करत आहेत.

# सोलापूर लोकसभेसाठी विधानसभानिहाय अभ्यास करा

## शरद पवारांनी पदाधिकाऱ्यांना दिले रणनीतीचे धडे

सुराज्य/सोलापूर

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी सोलापूर लोकसभांतर्गत येणाऱ्या विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी पक्षाच्या ताकतीचा अंदाज घेण्यासाठी सर्व गोष्टींचा अभ्यास करा, त्यानंतर मला भेटायला या त्यानंतर योग्य ते निर्णय घेऊ, असे रणनीतीचे धडे सोलापुरातून भेटायला गेलेल्या राष्ट्रवादीच्या शिष्टमंडळाला दिल्याचे वृत्त आहे.

पवार यांनी सोलापूर लोकसभा आणि त्याअंतर्गत येणाऱ्या शहरातील शहर उत्तर, शहर मध्य व दक्षिण विधानसभा मतदारसंघाबरोबरच आगामी महापालिका निवडणुकीच्यादृष्टीने सध्याच्या राजकारणाबद्दल चाचपणी करण्यासाठी काँग्रेसमधून राष्ट्रवादीत दाखल झालेल्या तिघांच्या शिष्टमंडळाला बुधवारी मुंबईला बोलावले होते. माजी महापौर महेश कोठे, ॲड. यू. एन. बेरिया तसेच सुधीर खरटमल यांचा या शिष्टमंडळात समावेश होता. गुरूवारी तिघांची शरद पवार यांच्या समवेत सुमारे अर्धातास चर्चा झाली. प्रथम त्यांनी सोलापूर लोकसभाबाबत काँग्रेसमध्ये काय हालचाली चालू आहेत याची माहिती घेतली. यावेळी माजी केंद्रीय गृह मंत्री सुशीलकुमार शिंदे यांचे मतदारसंघात दौरे वाढले आहेत. पक्षाच्या अनेक कार्यक्रमाला ते हजर असतात. त्यांनी लोकसभेची तयारी चालू केल्याचे पदाधिकाऱ्यांनी पवार यांना सांगितले असता पवार म्हणाले, मला शिंदे यांनी सांगितले आहे की मी आता कोणतीही निवडणूक लढणार नाही त्यांच्या आमदार कन्येसाठी तर तयारी करत नाहीत ना? असा सवाल केला.

त्यानंतर सोलापूर लोकसभा मतदार संघात येणाऱ्या दक्षिण, उत्तर, पंढरपूर-मंगळवेढा, मोहोळ, शहर मध्य, अक्कलकोट या मतदारसंघापैकी मोहोळ आणि शहरमध्य वगळता इतर विधानसभा मतदारसंघात भाजपचे आमदार आहेत. त्यामुळे आठ दिवसात सर्व विधानसभा मतदारसंघ निहाय आभ्यास करा. त्यानंतर भेटण्यास या. आपली भेट आणि चर्चा झाल्यानंतर तालुका निहाय पदाधिकाऱ्यांशी चर्चा करू. त्यानंतर वरिष्ठ नेते मंडळींची चर्चा करून सोलापूर लोकसभा बाबत योग्य तो निर्णय घेवू,असे पवार यांनी सांगितले



सध्या राष्ट्रवादीमध्ये मूळ पदाधिकाऱ्यांपेक्षा माजी महापौर कोठे, ॲड.बेरिया आणि खरटमल हे अधिक सक्रिय आहेत. त्यामुळे काँग्रेसमधून आलेल्या या तिघांना ताकद देऊन सोलापूर शहरात राष्ट्रवादी भक्कम करण्याचा शरद पवार यांचा प्रयत्न आहे.

मध्यंतरी आमदार रोहित पवार यांनी सोलापूर लोकसभा मतदारसंघाची अदलाबदल होऊन राष्ट्रवादी काँग्रेसला ही जागा मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यावर आमदार प्रणिती शिंदे यांनी आक्षेप घेतला होता. त्यानंतर ही चर्चा थांबली होती. आता पुन्हा सोलापूर लोकसभा राष्ट्रवादीकडे घेण्याबाबत चर्चा सुरू झाली आहे.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार ; तरुणाला २० वर्षे सक्त मजुरीची शिक्षा

सुराज्य/सोलापूर

अल्पवयीन बालिकेवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या आकाश रेवणसिद्ध काळे (वय २२ वर्षे रा. सोलापूर ) या तरुणाला विशेष न्यायाधीश कविता डी. शिरभाते यांनी २० वर्षे सक्तमजुरी आणि २५ हजार रुपये दंड अशी शिक्षा गुरुवारी ठोठावली. दंडाची वसूल रक्कम पीडितेस देण्याचे आदेशातही नमूद आहे .

आरोपी आकाश काळे हा खासगी नोकरी करीत असून याच्या घराजवळ ती पिडीत बालिका राहण्यास आहे. तिची आई धुणी भांडीचे काम करते. ती कामाला गेल्यानंतर १२ फेब्रुवारी २०२० रोजी दुपारच्या आकाशने पिडीतेवर अत्याचार केला होता. हा प्रकार तिच्या चुलत बहिणीने पाहून आजीला सांगितला. यासंदर्भात पीडीतेच्या आईने विजापूर नाका पोलिसात फिर्याद दाखल केली होती. पोलिसांनी पोक्सो अंतर्गत आकाश काळे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक केली होती. या प्रकरणाचा तपास तत्कालीन फौजदार बालाजी मस्के यांनी करून दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले होते.

खटल्यात सरकारतर्फे एकूण ६ साक्षीदार तपासण्यात आले. पिडीत मुलगी, (फिर्यादी)पिडीतेची आई, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि वैद्यकिय अधिकारी यांची साक्ष महत्त्वाची ठरली. सरकार पक्षाने मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने आरोपीला २० वर्षे सक्त मजुरी आणि दंडाची शिक्षा सुनावली. सरकारतर्फे ॲड. प्रकाश एस.जन्नू तर आरोपीच्या वतीने ॲड. शुभम माने यांनी काम पाहिले. कोर्ट पैरवी म्हणून महिला कॉन्स्टेबल सुनंदा घाडगे यांनी सहकार्य केले .

# चोराला घर मालकाने रंगेहाथ पकडले

सुराज्य/सोलापूर

घरात चोरी करण्यासाठी गेलेल्या चोराला घर मालकाने रंगेहात पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले. ही घटना सायली हाईटस वसंत विहार येथे मंगळवारी दुपारी घडली.याप्रकरणी श्रीकांत बबन बनपट्टी (वय-४०, रा.वसंत विहार) यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून सोमनाथ हरिदास सुरवसे (वय-३४.रा.तोडकर वस्ती,बाळे) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

बनपट्टे हे कामानिमित्त बाहेर गेले होते.त्यावेळी त्यांची पत्नी घरात घरकाम करत होत्या.आरोपी सोमनाथ हा उघड्या दरवाज्यातून त्यांच्या घरात प्रवेश करून बेडरूममध्ये जाऊन आतून कडी लावून चोरी करण्याचा प्रयत्न करत होता.दरम्यान श्रीकांत हे जेवण्यासाठी घरी आल्यानंतर बेडरूमला आतून कडी लावलेली होती.तेव्हा बनपट्टेने जोरजोरात दरवाजा वाजल्यानंतर आरोपी हा दरवाजा उघडून फिर्यादीला जोरात धक्का देऊन पळून जाण्याचा प्रयत्न करताना त्याला बनपट्टेने पकडले आणि या घटनेची माहिती पोलिसांना दिली,अशा आशयाची फिर्याद दिली आहे.दरम्यान पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले.याप्रकरणी श्रीकांत बनपट्टे यांच्या फिर्यादीवरून सोमनाथ सुरवसे याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. तपास पो.हे.कॉ. घुगे हे करत आहेत.

### वृध्देचे चार तोळ्याचे दागिने पळवले

वृध्द महिला एकटी घरी असल्याची संधी साधत दोन चोरांनी त्यांचे दागिने पॉलिश करून देण्याचा बहाणा करून १ लाख २० हजाराचे सोन्याचे चार तोळ्याचे दागिने चोरून नेले. याबाबत जयश्री पुंडलिक माने (वय-७४,रा.मार्कंडेय नगर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

माने या बुधवारी दुपारी घरात एकट्या असताना दोन अनोळखी इसम त्यांच्या घराजवळ येऊन भांडी पॉलिश करून देतो असे सांगून त्यांच्या जवळ आल्या. त्यानंतर त्यांच्या हातातील पाटल्या पाहून पॉलिश करून देतो असे सांगत विश्वास संपादन करून घेतले. त्यानंतर त्यांच्या गळ्यातील लॉकेट घेतले. त्यानंतर आरोपींनी सोन्याचे लॉकेट घेऊन घराच्या बाहेर पळून गेले.या प्रकरणी जयश्री माने यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून अज्ञात अज्ञात दोन चोरांवर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोसई रजपूत करत आहेत.

### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली

विजापूर नाका पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एक कॅन्टीन समोर लावलेली दुचाकी क्र.एमएच.१३.एएम.१७३८ ही अज्ञात चोराने चोरली.याबाबत अतुल अनिल साळुंके (वय-४०,रा. जवाहरलाल हौसिंग सोसायटी,अंत्रोळीकर नगर १, होटगी रोड) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून अज्ञात चोरावर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास फुलारी करत आहेत.

### तरुणाच्या खिशातील मोबाईल लंपास

नाष्ट्यासाठी तरुणाच्या खिशातील सात हजारांचा मोबाईल अज्ञात चोराने चोरला.याबाबत खाजप्पा सोमलिंग दोड्याळकर (वय-२५,रा.शहानगर,वांगी रोड) यांनी सलगरवस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून चोरावर गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलीस नाईक क्षिरसागर हे करित आहेत.ही घटना रामवाडीतील गोलू नाष्टा सेंटर मध्ये घडली.

# विद्या विकास शाळेचे सारथ्य प्रा. ए. डी. जोशी करणार

सुराज्य/सोलापूर

येथील ब्राह्मण समाज सेवा संघ संचलित वसंतराव देशमुख विद्या विकास हायस्कूलला संस्थेकडून उर्जितावस्था आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत. ही शाळा वाचवण्यासाठी या शाळेचे व्यवस्थापन आता प्रसिद्ध शिक्षणतज्ञ तथा इंडियन मॉडेल स्कूल चे प्रा. ए. डी. जोशी यांच्याकडे देण्यात आले आहे. येत्या जूनपासून या शाळेतील पटसंख्या वाढवून शैक्षणिक गुणवत्ता वाढवण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत,अशी माहिती शाळा समितीचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली.

ब्राह्मण समाज सेवा संघातर्फे गेल्या ७५ वर्षांपासून वसंतराव देशमुख विद्या विकास हायस्कूल चालवली जाते. पूर्वी गणपती घाट येथे असलेली ही शाळा सध्या नवी पेठ येथील सुवर्ण स्मृतीया इमारतीत सुरू आहे. शिक्षणतज्ञ प्रा. ए. डी. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली हजारो विद्यार्थी घडले आहेत. त्यांनी स्थापन केलेल्या इंडियन मॉडेल ग्रुप ऑफ स्कूलमधून शिक्षण घेऊन बाहेर पडलेल्या विद्यार्थ्यांनी यशाची उत्तुंग शिखरे पादाक्रांत केलेली आहेत.त्यामुळे त्यांच्या मार्गदर्शनातून या शाळेला पुनर्वैभव लाभेल,असा विश्वास कुलकर्णी यांनी व्यक्त केला.




**कृतज्ञता म्हणून जबाबदारी घेतली...**

मी याच शाळेचा विद्यार्थी.माझी शैक्षणिक जडणघडण याच शाळेतून झाली आहे.आज या शाळेवर आलेली वाईट वेळ पाहून ही शाळा चालवण्याचा आपण निर्णय घेतला.यात कुठलाही हेतू नाही.केवळ शाळेविषयी कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी हा निर्णय घेतला.

**-प्रा.ए.डी.जोशी**

**आव्हान नक्कीच पेलू...**

शाळेचे इन्फ्रास्टक्चर चांगले आहे.शिक्षकही गुणवत्तेचे आहेत. नव्या शैक्षणिक धोरणानुसार शाळा चालवणे आव्हानात्मक जरी असले तरी पालकांच्या सहकार्याने या शाळेला गतवैभव प्राप्त करून देवू.पटसंख्या वाढवण्याबरोबरच गुणवत्ता वाढवण्याचे प्रयत्न केले जातील.कुठल्याही खर्चाचा बोजा असणार नाही.पालकांवरही भार असणार नाही.केवळ प्रयत्न आवश्यक आहेत.

**-अमोल जोशी**

सोलापुरातील गाव भागातील विद्यार्थी - विद्यार्थिनींना अधिक अंतर असल्यामुळे किंवा अन्य कारणांमुळे इंडियन मॉडेल स्कूल या प्रथितयश शाळेमध्ये शिक्षण घेण्यास अडचणी निर्माण होतात. मात्र विद्यार्थ्यांची इंडियन मॉडेल स्कूलमध्ये शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा असते. यावर उपाय म्हणून वसंतराव देशमुख विद्या विकास हायस्कूलचे माजी विद्यार्थी असलेले शिक्षण तज्ञ प्रा. ए. डी. जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली वसंतराव देशमुख विद्या विकास हायस्कूलचे व्यवस्थापन चालावे, असा प्रस्ताव ब्राह्मण समाज सेवा संघाच्या संचालक मंडळाने प्रा. जोशी यांच्यासमोर मांडला होता. त्याला जोशी यांनी लागलीच मान्यता दिल्याचेही त्यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेस इंडियन मॉडेल ग्रुप ऑफ स्कूलचे संचालक अमोल जोशी, कॉलेजचे प्राचार्य प्रवीण देशपांडे, ब्राह्मण सेवा संघाचे सचिव दत्तराज कुलकर्णी, शाळा समितीचे अध्यक्ष संतोष कुलकर्णी, संचालक राम तडवळकर, शाळा समिती सदस्य संचालक जितेश कुलकर्णी, रणजीत विश्वरूपे, महेंद्र देवस्थळी, सुधीर कुलकर्णी, वामन कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# परिते येथे तीन लाखांची चोरी

सुराज्य/टेंभुर्णी

परिते (ता.माढा) येथे अज्ञात चोरट्याने दिवसा ढवळ्या चोरी करीत बंद घराचा कडी-कोंयडा तोडून कपाटात ठेवलेले तीन लाख रुपये चोरी केल्याची घटना बुधवारी सायंकाळी ०५ ते ०६ वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

याबाबत टेंभुर्णी पोलीस ठाण्याकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, यातील फिर्यादी नितीन विष्णू बाबर (वय-४०) हे परिते-वरवडे रोडवरील शेतातील वस्तीवर पत्नी व तीन मुली यांच्यासह राहत होते.त्यांचे परिते गावात साक्षी किराणा नावाचे दुकान असून ते शेती व किराणा व्यवसाय करतात.घटनेच्या दिवशी बुधवारी सकाळी ७.०० वा.नितीन बाबर हे परिते गावातील त्यांच्या साक्षी किराणा दुकानात दुकान उघडण्यास गेले होते. त्यानंतर त्यांची पत्नी व दोन लहान मुली या नातेवाईकांच्या विवाह समारंभासाठी चव्हाणवाडी (टें) येथे गेल्या होत्या.तर घरी फक्त मोठी मुलगी साक्षी ही एकटीच होती.

दुपारी पाच वाजेच्या सुमारास ती घराला कुलूप लावून शेळ्यांना चारा आणण्यासाठी जवळच शेतात गेलेली होती.ती ६.०० वा.परत घरी आली असता.तिला घराचा दरवाजा उघडा असल्याचे व घराचे लॉक तुटलेले दिसले.तिने घरात जाऊन पाहिले असता.कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडलेले, कपटाचे लॉकर ही उचकटलेले दिसले.कपाटात ठेवलेली रक्कम ही दिसली नाही.यामुळे तिने वडील बाबर यांना मोबा.वरून माहिती देऊन चोरी झाल्याने तातडीने घरी येण्यास सांगितले.

बाबर यांनी घरी येऊन पाहिले असता त्यांना चोरी झाल्याचे उघडपणे दिसून आले.यानंतर नितीन बाबर यांनी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

बाबर यांनी १५ दिवसांपूर्वी बँकेतून तीन लाख रुपये ट्रॅक्टर ट्रॉल्या खरेदी करण्यासाठी काढले होते.मात्र ट्रॉल्या कोठून घ्यायच्या या विचारात ते होते.या घटनेचा अधिक तपास पोसई डी. एस.ओमासे हे करीत आहेत.

## इको पार्कचे पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात

# केगाव नजीक ४७ एकर जागेवर पिकनिक पॉईंट

सुराज्य/सोलापूर

बस स्टँड पासून अवघ्या आठ किलोमीटर अंतरावर केगाव नजीक होत असलेल्या इको पार्कचे पहिल्या टप्प्याचे काम अंतिम टप्प्यात असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी दिली.

केगाव नजीक ४७ एकर जागेवर पिकनिक पॉईंट म्हणजेच इको पार्क विकसित केला जात आहे. या ठिकाणी डीपीडीसीतुन १ कोटी ४५ लाख रुपयाचा निधी तत्कालीन पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या कारकिर्दीत मंजूर झाला होता. या निधीतून विविध कामे पूर्णत्वाच्या मार्गावरच आहेत. सायकल ट्रॅकचे काम सध्या पूर्ण झाले आहे.

या इको पार्कमध्ये ( पिकनिक स्पॉट) मंजूर निधीतून पहिल्या टप्प्यात सायकल ट्रॅक, गझिबो, रॉक गार्डन, इंटरन्स प्लाझा, रॉ गार्डन, प्रसाधनगृह, ओपन गार्डन आदी कामे हाती घेण्यात आली आहेत. यश कन्स्ट्रक्शन यांच्याकडे या कामाचा मक्ता देण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यातील हे काम महिनाभरात पूर्ण होणार आहे, अशी माहिती अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी दिली. या संपूर्ण ४७ एकरावरील मास्टर प्लॅन तयार करण्यात आला आहे. कंपाऊंड वॉल, तारेचे कुंपणही करण्यात येत आहे. दरम्यान, विस्तीर्ण अशा ४७ एकरावर आतापर्यंत सुमारे दहा हजार वृक्ष लागवड करण्यात आली आहे. ही झाडे सहा फुटाच्या वरपर्यंत वाढली आहेत. हिरवाईने नटलेला हा परिसर आता सर्वांना आल्हादायक असा ठरणार आहे, असेही अतिरिक्त आयुक्त संदिप कारंजे यांनी सांगितले.

# मनसेने आयुक्त कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर विविध समस्यांच्या फलकांचे टांगले तोरण

सुराज्य/सोलापूर

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने गुरुवारी विस्कळीत पाणीपुरवठासह शहरातील विविध समस्यांच्या फलकांचे तोरण महापालिका आयुक्त कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर टांगण्यात आले. या अनोख्या आंदोलनाद्वारे शहरातील विविध समस्यांकडे लक्ष वेधण्यात आले.

पाणीपुरवठा सुरळीत करा यासह विविध मागण्यांकडे महापालिका प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे, असा आरोप करत सोलापूर शहरातील विविध प्रश्न व समस्यांचे फलक असलेले तोरण आयुक्त कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर टांगले. मागण्या मान्य न झाल्यास यापुढे तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही जिल्हाध्यक्ष विनायक महेंद्रकर आणि लोकसभा अध्यक्ष प्रशांत इंगळे यांनी दिला. यावेळी शहराध्यक्ष जैनुद्दिन शेख, अमर कुलकर्णी, अभिषेक रंपुरे, प्रसाद कुमठेकर, जितू टेंभुर्णीकर, गोविंद बंदपट्टे, पवन देसाई, यश महिंद्रकर, वैभव रंपुरे, गणेश पवार, राहुल अक्कलवडे, रुपेश बारड, सुमित अंबुरे, संतोष बारटक्के, सैपन जमखंदी, आदित्य महिंद्रकर आदी उपस्थित होते.



# विजापूर रोड परिसरातील अतिक्रमण हटविले

## महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाची कारवाई

सुराज्य/सोलापूर

**विजापूर रोडवरील इंचगिरी मठ ते छत्रपती संभाजी तलाव या रस्त्यावरील अतिक्रमण महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या माध्यमातून आज हटविण्यात आले. सहा खोकी व एक पत्रा शेड निष्काशीत करण्यात आले.**

विजापूर रोडवरील चैतन्य मार्केट परिसर तसेच रस्त्याच्या कडेला फेरीवाले, खोकी धारक यासह विविध प्रकारचे अतिक्रमण करण्यात आले होते. यामुळे या रस्त्यावर रहदारीस अडथळा येत असल्याच्या तक्रारी होत्या. महापालिका उपायुक्त मच्छिंद्र घोलप यांच्या आदेशानुसार गुरुवारी दुपारी महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने ही बेधडक कारवाई केली. मोठ्या पोलीस बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली.

इंचगिरी मठासमोर रस्त्यावर मासे विक्री करणाऱ्यांवरही कारवाई करण्यात आली. या ठिकाणी बांधण्यात आलेले अनधिकृत कट्टे आणि पत्रा शेड अतिक्रमण विरोधी पथकाने उद्ध्वस्त केले. यावेळी काही राजकीय नेते तसेच विक्रेत्यांनीही विरोध करण्याचा प्रयत्न केला मात्र विरोधाला न जुमानता महापालिका कर्मचाऱ्यांनी या ठिकाणी कारवाई फत्ते केली. येथील कॅरेट व इतर साहित्य जप्त करण्यात आले. वेळोवेळी प्रशासनाकडून अतिक्रमण काढण्याच्या सूचना देण्यात येतात मात्र येथील अनधिकृत विक्रेत्यांकडून त्याकडे दुर्लक्ष करण्यात येते. अखेर महापालिकेच्या या पथकाने ही मोठी मोहीम हाती घेतली. यादरम्यान सहा खोकी, एक पत्रा शेड संपूर्णपणे निष्काषीत करण्यात आले. भाजी विक्रेते, फेरीवाले अशा २० जणांना अतिक्रमण न करण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या.



**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस विशेषतः बार्शी शहर व तालुका आसपासचे परिसरातील जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

आमचं पक्षकार श्री राजेंद्र बबन वाघमारे रा.एकविराई गल्ली, बार्शी यांचे खरेदीखत मूळ दस्त क्र.७६५/१९९५ हा दि.१०/०४/२०२३ रोजी आमचे पक्षकार पांगरी ते बार्शी बस मधून प्रवास करत असताना सदर प्रवासादरम्यान बार्शी बस स्थानक येथे गहाळ झालेली आहे. त्याबाबत आमचे अशिलाने बार्शी शहर पोलीस स्टेशन येथे हरवलेल्या मालमत्तेचा नोंदणी क्र.०३१४/२०२३ अन्वये रितसर नोंद केलेली आहे.

सदरचा वर नमूद खरेदीखत मूळ दस्त कोणास आढळून आल्यास अथवा सापडल्यास सदर खरेदी दस्त खालील पत्त्यावर आणून द्यावा अथवा पोस्टाने पाठवून द्यावा. सदर खरेदीखताचा दुरूपयोग होवू नये तसेच बँक कामकाजासाठी म्हणून ही जाहीर नोटीस दिली. असे. ता.१२/०५/२०२३.

**सही/-**
**ॲड.एस.यु.सोनवणे**
**ॲडव्होकेट**
**जिल्हा व सत्र न्यायालय, बार्शी**
**ता.बार्शी जि.सोलापूर**
**मो.९८३४५८७८२६, पक्षकारतर्फे**
**ॲडव्होकेट**

# शेतकऱ्यांसाठी शासकीय योजना दुधनी बाजार समितीमध्ये राबवणार : आ. कल्याणशेट्टी

✔ सुराज्य / अक्कलकोट

**दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतकरी व व्यापाऱ्यांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही. शेतकऱ्यांसाठी शासकीय योजना दुधनी बाजार समितीमध्ये राबविल्या जातील. बाजार समितीवर भाजपाचा झेंडा फडकाविण्यासाठी जे कार्यकर्ते झटले. या कार्यकर्त्यांचा हा विजय असल्याचे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी केले.**



दुधनी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नूतन सभापतीपदी अप्पू उर्फ सातलिंगप्पा सैदप्पा परमशेट्टी तर उपसभापती पदी सिध्दाराम आण्णासाहेब बाके यांचा एकमेव अर्ज आल्याने अविरोध निवड करण्यात आली.गुरुवारी सकाळी ११ वा. निवडणूक निर्णय अधिकारी प्रकाश नालवार यांच्या अध्यक्षतेखाली निवडीची प्रक्रिया संपन्न झाली.

आमदार सचिन कल्याणशेट्टी व माजी आमदार सिद्रामप्पा पाटील यांच्या नेतृत्वाखाली दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत भाजपाने माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी पॅनलचा दारुण पराभव केला होता.

सभापती व उपसभापतींची निवड गुरुवारी करण्यात आली. या निवडीनंतर सभापती व उपसभापती यांचा सत्कार करुन फटाक्यांची आतषबाजीने जल्लोष करण्यात आला.

या निवडीप्रसंगी आमदार सचिन कल्याणशेट्टी, मुंबईचे आमदार अमित प्रतापसिंह, माजी आमदार सिद्रामप्पा पाटील, नूतन संचालक देवेंद्र सिद्राम बिराजदार, विश्वनाथ तुकप्पा नागुर, विश्वनाथ निंगप्पा कोगनुर, मल्लिकार्जुन मडोळप्पा झळकी, मोतीराम शिवू राठोड, सुवर्णा सुधीर मचाले, अश्विनी विजयकुमार सालेगाव, वहिदपाशा इब्राहिम शेख, निंगप्पा सिद्राम पुजारी, सिध्दाराम निलकंठ तोळणुरे, रमेश रेवणसिध्द पाटील, शिवानंद बाबुराव पाटील, ईरण्णा अंदप्पा दसाडे, सातलिंग शरणप्पा परमशेट्टी, चंद्रकांत श्रीमंतराव येगदी, बाबु गणपती कोळी, सचिव स्वामीनाथ स्थावरमठ या संचालकासह इतर मान्यवरांमध्ये अण्णप्पा बाराचारी, सिध्देश्वर कल्याणशेट्टी, अप्पासाहेब पाटील, महेश हिंडोळे, भाजपा महिला ता.अध्यक्षा सुरेखा होळीकट्टी, भाजपा शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, मिलन कल्याणशेट्टी, विवेकानंद उंबरजे, सागर कल्याणशेट्टी, दयानंद उंबरजे, सागर कत्ते,संदीप कत्ते, सुधीर मचाले, राजकुमार झिंगाडे, प्रकाश पाटील, मल्लिकार्जुन आळगी, सुर्यकांत माळगे, दयानंद बिडवे, चंद्रकांत दसले, नन्हु कोरबु, रजाक सय्यद, विरभद्र सलगरे, शिवशंकर स्वामी, कांतु धनशेट्टी, बाळासाहेब एकबोटे, धनंजय गाढवे, राजु भरडे,महांतेश कोंपा आदीजण उपस्थित होते.

यावेळी व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष सुभाष परमशेट्टी, उपाध्यक्ष राजशेखर दोशी, शिवानंद हौदे, गिरमलप्पा सवळगी, रामचंद्र बिराजदार, शंकर भांजी, महेश पाटील, अतुल मेळकुंदे, बसवराज हौदे, हणमंत कलशेट्टी, सुभाष हौदे, शिवशरणप्पा हाबसी, जगन्नाथ जाधव, लक्ष्मीपुत्र पाटील, शाणप्पा दैनक, बसवराज परमशेट्टी, गोविंदप्पा परमशेट्टी, निर्मला गायकवाड, दौलत हौदे, मल्लिनाथ येगदी, भिमा अंदेनी, इरय्या पुराणिक, उमेश सावळसुर, काशिनाथ यरगल, रेणप्पा माशाळ, मल्लिनाथ टक्का, बाबा टक्कळकी, गुरुशांत बोळगोंडा, अर्जुन पुजारी, शांतलिंग वागदरी, शांतलिंग अंदेनी, लक्ष्मीपुत्र अंदेनी, मल्लिनाथ कामनळळी यांच्यासह भाजपाचे असंख्य कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## कोरवलीत जिल्हा परिषद शाळेसाठी माजी विद्यार्थ्यांनी केली मुदत ठेव जमा

✔ **विरवडे बु।। :** कोरवली ता. मोहोळ येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील माजी विद्यार्थी सेवानिवृत्त केंद्रप्रमुख अमोगसिध्द गुरुसिध्द कोरे यांनी स्वर्गीय सद्गुरु चिदानंद महाराज कुन्नूर ता. विजयपूर यांच्या स्मरणार्थ एक मे रोजी शाळेला पाच हजार रुपये मुदत ठेव म्हणून कामती केंद्राचे केंद्रप्रमुख अंकुश कुंभार यांच्याकडे जमा केले. यावेळी मुख्याध्यापक सरोजिनी म्हमाणे, सरपंच सुज्ञानी पाटील उपस्थित होत्या. यापूर्वीही अमोगसिध्द कोरे यांनी १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारी अशा दोन्ही वेळेला पाच पाच हजार रुपये मुदत ठेवी दिलेल्या आहेत. त्यांच्याकडून आतापर्यंत एकूण मुदत ठेव १५ हजार रुपये शाळेकडे जमा झाली आहे.

अशा प्रकारची जिल्हा परिषद शाळेसाठी रुपये पाच लाखांची मुदत ठेव करण्याचा मानस सेवानिवृत्त केंद्रप्रमुख अमोगसिध्द कोरे यांनी व्यक्त केला. त्याचबरोबर शाळेचे माजी विद्यार्थी व सध्या मुंबई या ठिकाणी सहाय्यक पोलीस निरीक्षक असलेले रखमाजी कल्लाप्पा गायकवाड या माजी विद्यार्थ्यांनी शाळेच्या शैक्षणिक व भौतिक सुविधेसाठी वीस हजार रुपये देणगी दिली आहे.

या देणगी मधून शाळेमध्ये शालेय पोषण आहार करताना विद्यार्थ्यांना दुपारच्या वेळी बसण्यासाठी पत्रा शेड तयार करण्यात येणार आहे. तसेच जमा झालेल्या या मुदत ठेवींमधून मिळणाऱ्या व्याजामधून दरवर्षी १५ ऑगस्टला होतकरू, गरीब व हुशार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात येणार असल्याचे व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष जीवन म्हमाणे यांनी सांगितले. यावेळी उपसरपंच बाळासाहेब कस्तुरे, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष बंडू कस्तुरे, सदस्य सचिन म्हमाणे, लिंगराज नंदुरे, दत्तात्रय मुरगुंडे, महादेव म्हमाणे, ग्रामसेविका सारिका काळे, साधू पाटील, आनंद घुले, सहशिक्षक बसवराज कोरे, पूजा जाजे, सरिता कुलकर्णी, शुभांगी म्हमाणे, यशोदा गवळी उपस्थित होते.

## सारोळे येथे वादळी वाऱ्याने घरावरचे पत्रे उडाले

✔ **मोहोळ :** सारोळे (ता. मोहोळ) येथे वादळी वाऱ्याने घरावरचे पत्रे उडून घराचे नुकसान झाले तर वृद्ध इसम जखमी झाला.

याबाबत मिळालेल्या माहिती नुसार रघुनाथ बापू झेंडे यांची वस्ती सारोळे गावाच्या शिवारात मेन रोडच्या उत्तरेस आहे बुधवारी १० मे रोजी सायंकाळी पाच वाजनेच्या सुमारास जोराने वादळी वारा सुरु झाला या वादळात रघुनाथ झेंडे यांच्या घरावरील पत्रे उडून पडले यात रघुनाथ झेंडे यांना पाइपचा मार लागून ते जखमी झाले यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मोहोळ शहर अध्यक्ष रमेश शिंदे हे त्या परिसरात होते त्यानी ही घटना समजताच तात्काळ त्या ठिकाणाला भेट दिली व मोहोळचे तहसिलदार प्रशांत बेंडसे यांना फोनवर ही माहीती दिली त्यांनी तात्काळ तलाठी यांना ही माहीती देवून त्या ठिकाणी पाठवले त्यांनी या घटनेचा पंचनामा केला परंतु शासनाची मदत केव्हा मिळेल ? यासाठी शासन दरबारी तातडीचे प्रयत्न करून समस्या निवारण करणे आवश्यक आहे अन्यथा तोपर्यंत त्या कुटूबाला किती काळ उघड्यावर काढावा लागेल ? यासाठी तातडीची मदत मिळणे आवश्यक आहे.



## मातंग समाजाच्या वतीने नगरपरिषदेवर धडक मोर्चा

### अण्णाभाऊ साठे चौक नामकरण करण्याची मागणी

✔ सुराज्य / कुर्डूवाडी

कुर्डूवाडी शहरात सन १९९७ पासून जकात चेक नका परिसरात लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे पुतळा अस्तित्वात असून या चौकास अण्णाभाऊ साठे चौक असे नामकरण करण्याच्या मागणीसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने कुर्डूवाडी नगरपरिषदेवर हलगी मोर्चा काढण्यात आला.

प्रारंभी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे, राजमाता अहिल्याबाई होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज, क्रांतीज्योती फुले यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करत हलग्यांच्या गजरात नगरपरिषदेवर मोर्चा धडकला.

बालोद्यान चौकात रेल्वे गेट जवळील जकात चेक नाका परिसरात सन १९९७ पासून लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा अस्तित्वात आहे. त्यानुसार चेक नाका परिसरातील चौकास अण्णाभाऊ साठे चौक असे नाव देण्यात यावे. या मागणीसाठी मातंग समाजाच्या वतीने मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी नगरपरिषद प्रशासनाने सकल मातंग समाज बांधवांना लेखी आश्वासन दिल्यानंतर हलगी मोर्चा विसर्जित करण्यात आला.

यावेळी ज्येष्ठ नेते दत्ता अडसूळ, वंचित बहुजन आघाडीचे युवक नेते बाळासाहेब लांडगे, प्रदीप सोनटक्के, सुरज अस्वरे, रवी पाटोळे, बंटी अस्वरे, लक्ष्मण आस्वारे, दलित स्वयंसेवक संघाचे अशोक चव्हाण, माजी नगरसेवक किसन हानवते आनंद हानवते, भाजपा अल्पसंख्यांचे बालाजी गायकवाड, मातंग एकता आंदोलन चे रोहित कांबळे विजय देवकते, लहुजी शक्ती सेनेचे श्रीकांत शिरसागर, दीपक कांबळे , आकाश खिलारे, लक्ष्मण कांबळे, ईश्वर कांबळे, सतीश साठे, मधु चांदणे, एमबी कांबळे, अभिजीत अस्वरे, मोहन लोंढे, संजय साठे, रतन खवळे, मीना चांदणे, दिपा महिते पूजा शिरसागर, पुजा गायकवाड अधिका अवघडे जोति असवरे सखुबाई आडसुळ धाबाई साठे सुनिता अस्वरे सुनिल कसबे अमोल ढावरे यांच्यासाह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## मंगळवेढा येथे अडीच लाखाचे दागिने पळविले

✔ **सोलापूर :** आतून बंद असलेल्या सेफ्टी दरवाजास लावलेले कुलूप तोडून चोरट्याने कपाटातील २ लाख ३२ हजार रुपयांचे दागिने पळविले . ही चोरी मंगळवेढा येथील कारखाना रोडवर मंगळवारी रात्रीच्या सुमारास घडली. या संदर्भात मनोज रावसाहेब आवळेकर (रा.कारखाना रोड मंगळवेढा) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली . मंगळवारी रात्री ११ वाजेच्या सुमारास चोरट्याने आतून बंद असलेल्या सेफ्टी दरवाजा लावलेले कुलूप तोडून घरात प्रवेश केला आणि कपाटाच्या ड्रॅावर मधील ४५ ते ५० ग्रॅम सोन्याचे दागिने, घड्याळ आदी घेऊन पसार झाले. अशी नोंद पोलिसात झाली.

## जीसीपीची मोटारसायकलला समोरासमोर धडक

✔ सुराज्य / सांगोला

कोळा करगणी रोड वरील बाणूरगड फाट्याजवळ जीसीपी ने चुकिच्या मार्गाने येऊन मोटार सायकलला समोरासमोर जोरात धडक दिल्याने मोटारसायकल वरील गोविंद रामा आलदर (वय ४५) हा जागीच मयत झाला तर मुलगा रुपेश हा गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवार १० मे रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास घडली. गोविंद रामा आलदर हा कोळागावाखालील कराड वाडी येथे कुटुंबासमवेत राहत असून आटपाडी तालुक्यातील दिघंची येथे वायर म्हणून काम करत असतो. बुधवार १० मे रोजी सायंकाळी सहा वाजता स्वतःच्या मोटर सायकल वरून (एम एच ०४ बी ए ६५१३) वरून कोळा येथे कामानिमित्त मुलगा रुपेश व गोविंद हे गेले होते. बानुर्गड फाट्याजवळ चुकिच्या दिशेने विना नंबर प्लेटची जीसीपी ही करगणी होऊन कोळ्याकडे येत असता मोटार सायकल ला समोरासमोर जोरात धडक झाल्याने त्यामध्ये गोविंदा स छातीला जोरात मार लागून जागीच मयत झाला.

## मकाई सहकार साखर कारखान्याचा बिगुल वाजला; असा आहे प्रोग्राम

✔ सुराज्य / करमाळा

तालुक्यातील मकाई सहकारी साखर कारखान्याची संचालक मंडळाची निवडणूक २०२३- २४ ते २०२८- २९ हा कार्यक्रम जाहीर झाला आहे. १७ संचालक निवडीसाठी हा निवडणूक कार्यक्रम जाहिर झाला आहे. १६ जून २०२३ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ यावेळेत मतदान होणार असल्याची माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा प्रभारी तहसीलदार विजयकुमार जाधव यांनी दिली आहे.

या निवडणूकीसाठी नामनिर्देशन पत्र निवडणूक निर्णय अधिकारी, तहसील कार्यालय येथे १२ ते १८ याकालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मिळणार आहेत. मिळालेल्या नामनिर्देशन पत्राची यादी त्या त्या दिवशी प्रसिध्द करण्यात येणार आहे. नामनिर्देशन पत्राची छाननी १९ मे रोजी सकाळी ११ वाजलेपासून करण्यात येणार आहे. जे नामनिर्देशन पत्र ग्राह्य होतील त्याची यादी २२ मे रोजी निवडणूक निर्णय अधकिारी यांच्या कार्यालयात प्रसिध्द करण्यात येणार आहेत. उमेदवारांना नामनिर्देशन पत्र २२ मे ते ५ जून या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मागे घेता येतील. निवडणूक चिन्हाचे वाटप ६ जून २०२३ करण्यात येणार आहे. मतदान १६ जून होणार असून निकाल १८ जून रोजी घोषित करण्यात येणार आहे.



## रिपाइं आठवले यांच्यावतीने नूतन प्रांताधिकारी टिळेकर यांचा सत्कार

✔ **वेळापूर :** उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी माळशिरस विभाग अकलुज नामदेव टिळेकर यांनी नुतन प्रांताधिकारी पदाचा पदभार स्वीकारल्याबद्दल रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले माळशिरस तालुका यांच्या वतीने सत्कार करून शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष एन के साळवे, सोलापूर जिल्हा अध्यक्ष सोमनाथ भोसले, युवक जिल्हा कार्याध्यक्ष किरण धाईंजे, तालुकाध्यक्ष मिलिंद सरतापे, तालुका कार्याध्यक्ष समाधान भोसले, युवक तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, युवक तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, तालुका उपाध्यक्ष शेखर सावंत, तालुका उपाध्यक्ष संतोष कांबळे, तालुका उपाध्यक्ष सुनील ओवाळ, सद्दाम तांबोळी, नवनाथ माने, इत्यादी उपस्थित होते.

## मोहोळ बाजार समितीच्या सभापतीपदी गावडे उपसभापती प्रशांत बचुटे बिनविरोध

✔ सुराज्य / मोहोळ





मोहोळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक राजनजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली आमदार यशवंत माने लोकनेते शुगर अनगर चे चेअरमन बाळराजे पाटील व सिनेट सदस्य अजिंक्यराणा पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली होती.

आज सभापती,उपसभापती चि निवड मोहोळ बाजार समिती कार्यालयातत पार पडली सभापती पदासाठी सावळेश्वरचे धनाजी सुरेश गावडे तर उपसभापती पदासाठी वरकुटे येथील प्रशांत भागवत बचुटे यांचे एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड घोषित करण्यात आली .तत्पूर्वी माजी आमदार राजनजी पाटील आमदार यशवंत माने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची तालुकाध्यक्ष प्रकाश चवरे हनुमंत पोटरे आदी मान्यवरांनी संचालकांचे मते जाणून घेतली व त्यानंतर सभापती व उपसभापती पदाची नावे जाहीर केली.

याप्रसंगी माजी आमदार राजनजी पाटील आमदार यशवंत माने राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष प्रकाश चवरे हनुमंत पोटरे जगन्नाथ कोल्हाळ माजी उपसभापती दत्ता पवार माजी संचालक शशिकांत पाटील मोहोन होनमाने, बाळासाहेब पाटील,आनिल कादे कालिदास गावडे आदी सह सर्व संचालक, मान्यंवर उपस्थित होते.

निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून व्हि.बी.माने तर सहाय्यक म्हणून तसेच सचिव सचिन पाटील यांनी काम पाहिले.

## शनिवारी अकलूज येथे रिपाइंची बैठक

✔ सुराज्य / वेळापूर

अकलुज(ता.माळशिरस) येथे शनिवार दि १३ मे रोजी १२.०० वाजता अकलूज शासकिय विश्रामगृह येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले तालुका कार्यकारिणीची बैठक माळशिरस तालुका पक्षनिरीक्षक पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष आप्पासाहेब जाधव, प मह.सचिव बाळासाहेब कसबे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये तसेच रिपाइं आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली आहे.

याप्रसंगी बैठकीस पश्चिम महाराष्ट्र पदाधिकारी, जिल्हा पदाधिकारी उपस्थित राहुन मार्गदर्शन करणार आहेत.

तरी तालुका पदाधिकारी यांनी आपल्या भागातील सर्व पदाधिकारी कार्यकर्ते सदस्य यांना निरोप देऊन सर्वांना सोबत घेऊन बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

असे आव्हान रिपाइं आठवले माळशिरस तालुका अध्यक्ष मिलिंद सरतापे, तालुका सरचिटणीस मारुती खांडेकर, तालुका कार्याध्यक्ष समाधान भोसले, युवा आघाडी तालुकाध्यक्ष दशरथ नवगिरे, युवा आघाडी तालुका सरचिटणीस प्रवीण साळवे, युवा आघाडी तालुका कार्याध्यक्ष विनोद रणदिवे यांनी केले आहे सदर बैठकीत नव्याने क्रियाशील सभासद वाढविणे. शिर्डी येथील अधिवेशन बाबत चर्चा करणे., शाखा नुतनीकरण करणे., पक्ष संघटना मजबूत करण्याबाबत चर्चा करणे, आयत्या वेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे. अदि विषयावरती बैठक आयोजित करण्यात आली आहे.



## माळशिरस डॉक्टर सेलच्या तालुका अध्यक्षपदी पिलीव येथील डॉ. निलेश कांबळे

✔ **पिलीव :** माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील युवा सेनेचे तालुका उप प्रमुख डॉ निलेश कांबळे यांची माळशिरस तालुका डॉकटर सेलच्या तालुका अध्यक्ष पदी तसेच सोलापूर येथील पुणयशलोक अहील्यादेवी होळकर विद्यापिठाच्या कक्ष सदस्यपदी निवड झाली आहे.

या निवडीबद्दल डॉकटर निलेश कांबळे यांचा शिवसेना माळशिरस तालुका प्रमुख संतोष राऊत, युवा सेना सोलापूर जिल्हा अध्यक्ष गणेश इंगळे, तालुका उपाध्यक्ष महादेव बंडगर, शिवसेना अकलुज शहर प्रमुख अनिल बंदपटटे, युवा सेना माळशिरस तालुका उपप्रमुख दत्ता साळुंखे, युवा सेना अकलूज शहर अध्यक्ष शेखर भैया खिलारे व इतर पदाधिकारी यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. डाक्टर निलेश कांबळे यांचे हया निवडीबद्दल अभिनंदन व कौतुक होत आहे.

## पांचाळ सोनार समाज संघटनेच्या वतीने सामुदायिक मुंजीचा सोहळा

✔ सुराज्य / अकलूज

**अकलुज येथील पांचाळ सोनार समाज संघटनेच्या ६ व्या सामुदायिक व्रतबंध सोहळा मोठ्या थाटामाटात उत्साहाने साजरा करण्यात आला असुन या सोहळ्यात ४१ बटुवर उपनयन संस्कार करण्यात आले. शंकररनगर-अकलूज येथे कांतीलाल सांस्कृतिक भवनात बुधवारी सामुदायिक व्रतबंध (मुंजी) समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.**



या सामुदायिक व्रतबंध सोहळ्यातील सहभागी ४१ बटुवर धार्मिक संस्काराने उपनयन संस्कार करण्यात आले.बटुंना आशिर्वाद देण्यासाठी भारतीय जनता पक्षाचे जिल्हा संघटक धैर्यशील मोहिते पाटील, शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील,माजी सरपंच किशोरसिंह माने-पाटील,सुवर्णपुष्प संस्था पुणे अध्यक्ष जगदीश महामुनी,शोभाताई महामुनी, प्रशांत दिक्षित,शशिकांत दिक्षित,संजय भारकरे,शामसुंदर धर्माधिकारी कोल्हापूर,कौलवकर बंधु कागल,मनोज पंडित धाराशिव,संतोष सोनार बीड,सतिश वेदपाठक, राजाभाऊ दिक्षित (धारुर),प्सोरदिप दिक्षित औरंगाबाद सोलापुर जिल्हा पांचाळ सोनार समाज संस्थेचे माजी जिल्हाध्यक्ष पद्माकर दिक्षित,प्रशांत दिक्षित,मोहन वेदपाठक,सचिन महामुनी मोहोळ,कुर्डवाडीचे माजी नगराध्यक्ष राजेंद पारखे,संजय बानकर इंदापुर, अमोल महामुनी जेऊर, प्रशांत पळसे व पद्माकर धर्माधिकारी बारामती यांच्यासह राज्यभरातील समाजाचे पदाधिकारी, समाज बांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पौरोहित्य सनद महामुनी व त्याच्या सहकाऱ्यांनी करुन सहभागी बटुवर उपनयन संस्कार करुन कार्यक्रम स्तरापासून मारुती मंदिरापर्यंत बटुंची शोभायात्रेत काढण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी बंटुवर अक्षता टाकुन आशिर्वाद दिले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संघाचे अध्यक्ष राजीव लोहकरे, उपाध्यक्ष सुभाष पोतदार, खजिनदार हर्षद लोहकरे, सचिव प्रकाश कामेगांवकर, कार्याध्यक्ष बालाजी दिक्षित, सदस्य संजय पोतदार,यांनी परीश्रम घेतले.

## सत्ता संघर्ष






## साद - पडसाद

### शरद पवार काय म्हणाले?

बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार भेटले. उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव भेटले. विरोधकांची एकी राहणं गरजेचं असल्याचं आजच्या बैठकीत एकमत झालं. कर्नाटकमध्ये तेथील जनता धर्मनिरपेक्ष सरकार आणण्यासाठी आग्रही आहे, हे एक्झिट पोलमधून दिसून येतंय. नितीश कुमार–राहुल गांधी आणि विरोधी पक्षाच्या नेत्यांची बैठक नवी दिल्लीत झाली होती. त्यावेळीही विरोधी पक्षांच्या रणनितीवर आमची चर्चा झाली होती. भाजपविरोधात विरोधक पूर्ण ताकदीने काम करतील.

### पवार पंतप्रधान होतील? : नितीश कुमार

त्याचवेळी भाजप देशहिताच्या विरोधात काम करतंय. त्यामुळे विरोधी पक्षांनी एकत्र यावं, यासाठी माझा प्रयत्न असल्याचं सांगताना विरोधी आघाडीचा चेहरा म्हणून जर शरद पवार पुढे आले तर मला अधिक आनंद होईल, असं नितीश कुमार म्हणाले.

### लोकशाहीचा, लोकमताचा विजय झाला

सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्राच्या संदर्भात आज जो निकला दिला आहे. या निकालाबद्दल आम्ही पूर्ण समाधान व्यक्त करतो. आणि निश्चितपणे लोकशाहीमध्ये लोकशाहीचा, लोकमताचा आज पूर्णपणे विजय झालेला आहे, असं देवेंद्र फडणवीस यांनी नमूद केलं. हा जो काही निकाल आहे, त्यातील चार पाच महत्त्वाचे मुद्दे देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी मांडले. उद्धव ठाकरेंना पुन्हा मुख्यमंत्री बनवता येणार नाही, असं न्यायालयाने स्पष्ट केलं आहे.

# मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा : राऊत

✔ सुराज्य/मुंबई

आताचं सरकार बेकायदेशीर-घटनाबाह्य असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने मान्य केलं. शिंदे गटाने बजावलेला व्हीप बेकायदेशीर ठरल्यावर त्यानंतर झालेली पुढील सगळी प्रक्रिया ही बेकायदेशीर ठरते. कोणत्याही गटाला शिवसेनेवर म्हणजे पक्षावर दावा करता येणार नाही, हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय न्यायालयाने दिलेला आहे.

विश्वासदर्शक ठरावापासून बहुमत चाचणी बोलाविण्यापर्यंत राज्यपालांच्या सगळ्या कृती बेकायदेशीर असल्याचं सर्वोच्च न्यायालयाने म्हटलं. उद्धव ठाकरे यांनी जर राजीनामा दिला नसता तर आम्ही पूर्वस्थिती लागू केली असती, असंही न्यायालयाने म्हटलं. याचाच अर्थ आताचं सरकार बेकायदेशीर आहे. मुख्यमंत्री शिंदे यांच्यात थोडी जरी नैतिकता असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी मागणी केली.



महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा बहुप्रतिक्षित निकाल आज सर्वोच्च न्यायालयाने दिला. यात महाराष्ट्राच्या अनुषंगाने नबाम रेबिया प्रकरण सात न्यायमुर्तींच्या घटनापीठाकडे वर्ग करण्याचा निर्णय न्यायालयाने दिला. त्याचवेळी शिंदे गटावर तसेच राज्यपालांवर कडक शब्दात ताशेरेही ओढले. राज्यपालांच्या कृती बेकायदेशीर असल्याचं सांगत त्यांनी विशेषाधिकार कायद्याला धरुन वापरले नाहीत, अशी सणसणीत चपराक लगावली. दुसरीकडे अपात्रतेपासून वाचण्यासाठी कुणीही शिवसेनेवर दावा सांगू शकत नाही, असंही न्यायालयाने म्हटलं. यावर राऊतांनी लक्ष वेधले.

संजय राऊत म्हणाले, हे सरकार बेकायदा असल्याचं शिक्कामोर्तबच कोर्टाने केलंय, मुख्यमंत्री शिंदे यांच्यात थोडी जरी नैतिकता असेल तर त्यांनी राजीनामा द्यावा.

### न्यायालयाच्या निर्णयावर उद्धव ठाकरे म्हणाले?

मी नैतिकता दाखवून राजीनामा दिला होता. आता तीच नैतिकता दाखवून शिंदे फडणवीस यांनीही राजीनामा द्यायला हवा, अशी मागणी करतानाच माझ्या शिवसेनेचाच व्हीप लागू होणार आहे, असं उद्ध व ठाकरे यांनी ठणकावून सांगितलं. तसेच सत्तेसाठी हापाललेल्या लोकांचं राजकारण आजच्या निकालाने उघडं पडलं, आजच्या निकालाने त्याची चिरफाड झाली, असंही ठाकरे म्हणाले.

## सर्वोच्च न्यायालयाचा दणका; एकनाथ शिंदे यांची गटनेतेपदी केलेली निवड बेकायदा

विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची गटनेते पदी केलेली निवडही सर्वोच्च न्यायालयाने बेकायदा ठरवली आहे. त्यामुळे मुख्यमंत्री शिंदे यांना चांगलाच दणका मिळाला आहे. विधानसभा अध्यक्षांनी नव्याने गटनेतेपदी निवड करावी, असे आदेश न्यायालयाने दिले आहेत. एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड केल्यानंतर ते गुजरातला निघून गेले. त्यांच्या सोबत काही आमदारही होते. त्यावेळी अनेक राजकीय घडामोडी घडल्या. त्यात उद्धव ठाकरे यांनी पक्षप्रमुख या नात्याने एकनाथ शिंदे यांची गटनेते पदावरुन हकालपट्टी केली. एकनाथ शिंदे यांच्या जागी गटनेता म्हणून आमदार अजय चौधरी यांची निवड करण्यात आली. या निवडीवर विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी शिक्कामोर्तब केले. झिरवाळ यांचा हा निर्णय योग्यच होता, असा निर्वाळा न्यायालयाने दिला आहे. अजय चौधरी यांची निवड पक्षप्रमुख म्हणून उद्धव ठाकरे यांनी केली होती. शिवसेना पक्ष म्हणून हा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे तो निर्णय नियमानुसार योग्यच होता, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले. फुटीर आमदारांनी ठराव मंजूर करुन एकनाथ शिंदे यांची गटनेते पदी पुन्हा निवड केली. ही निवड विद्यमान विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी मान्य केली. मात्र फुटीर आमदारांनी ठराव मंजूर करून एकनाथ शिंदे यांची गटनेते पदी निवड केली होती. ही निवड पक्षाने केली नव्हती. परिणामी ही निवड नियमानुसार करण्यात आली नव्हती. ती निवड बेकायदाच होती, असे सर्वोच्च न्यायालयाने निकालात स्पष्ट केले आहे.

## निवडणूक आयोगाचा निकाल पूर्वलक्षीप्रभावाने लागू होईल

**न्यायालयाचे निरीक्षण, नार्वेकरांची कोंडी**

✔ **नवी दिल्ली :** केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्णयानुसार आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय घेणे चुकीचे ठरेल. कारण तसे केले तर निवडणूक आयोगाचा निकाल पूर्वलक्षीप्रभावाने लागू हाईल आणि ते कायद्याच्या विरोधात ठरेल, असे मत सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केले आहे. त्यामुळे १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय घेताना मींच ठरवेन पक्ष कोणाचा आणि व्हीप कोणाचा असे वक्तव्य करणारे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर आता कशाप्रकारे निर्णय घेतील हे बघावे लागेल.

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला. हा निर्णय देताना न्यायालयाने विविध शक्यता निकालात वर्तवल्या आहेत. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या संभाव्य निर्णयामुळे विधानसभा अध्यक्षांसमोरील अपात्रतेची सुनावणी थांबवली जाऊ शकत नाही. अपात्रतेवर निर्णय घेताना निवडणूक आयोगाच्या निर्णयावर अवलंबून राहता येणार नाही. जर निवडणूक आयोगाचा निकाल ग्राह्य धरून अपात्रतेचा निर्णय दिला गेला तर निवडणूक आयोगााच निकाल पूर्वलक्षीप्रभावाने लागू होईल आणि ते कायद्याला अनुसरुन होणार नाही, असे मत न्यायालयाने व्यक्त केले आहे. न्यायालय म्हणाले, निवडणूक आयोगाचा निकाल हा ज्या दिवशी दिला जातो तेव्हापासून लागू होतो. जर एखाद्या गटाला चिन्ह मिळाले आणि त्या गटाचे आमदार अपात्र ठरले तर जे सदस्य सभागृहात असतील त्यांनी नियमांचे पालन करायला हवे. अन्य चिन्हासाठी प्रयत्न करायला हवे. निवडणूक आयोग आणि चिन्हाचे आदेश सुसंगत नसतात. कराण दोन्ही संस्थांनी वेगळ्या मुद्द्यांवर आणि वेगळ्या परिस्थितीत निर्णय घेतलेला असतो. त्यामुळे दोन्ही निकाल हे स्वतंत्र तसेच वेगळेच असतात, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले आहे. १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय घ्यायला सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना सांगितले आहे. मी अध्यक्ष आहे. त्यामुळे मी ठरवणार पक्ष कोणाचा आणि व्हीप कोणाचा लागू होणार, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केले आहे. विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी १६ आमदारांना अपात्र ठरवले आहे.

## पण व्हीप माझ्याच शिवसेनेचा चालणार : उद्धव ठाकरे

✔ सुराज्य/मुंबई

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने आज दिलेला निर्णय हा सत्तेसाठी हपापलेल्या लोकांचं उघडनागडं राजकारण उघड पाडणारा आहे, अशी जळजळीत टीका उद्धव ठाकरे यांनी केली. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाबाबत मला समाधान वाटते. हा निकाल केवळ शिवसेनेच्या भवितव्याच्या नव्हता, तर लोकशाही जिवंत ठेवण्याच्यादृष्टीने आवश्यक होता. सर्वोच्च न्यायालयाने यानिमित्ताने सत्तेसाठी हपापलेल्या लोकांचं राजकारण उघडं पाडलं, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले. ते गुरुवारी मुंबईत आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत बोलत होते.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निकालात राज्यपाल महोदयांची भूमिका संशयास्पद आणि अयोग्य असल्याचे म्हटले. या निकालामुळे राज्यपालांचं वस्त्रहरण झाले आहे. आजपर्यंत राज्यपाल पद हे आदराचं होतं, पण भाजपने या यंत्रणेचे धिंडवडे काढले आहे. त्यामुळे भविष्यात राज्यपाल पद हे अस्तित्त्वात असावे की नाही, याचाही विचार आपण केला पाहिजे. राज्यपालांना अधिवेशन बोलावण्याचा अधिकार नव्हता. सर्वोच्च न्यायालयाने आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय विधानसभा अध्यक्षांकडे सोपवला. पण पक्षादेश (व्हिप) हा माझ्याच शिवसेनेचा असेल. त्यामुळे आता आम्ही लवकरात लवकर विधानसभा अध्यक्षांकडे तशी मागणी करु, असे उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

तत्पूर्वी उद्धव ठाकरे यांनी बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार आणि तेजस्वी यादव यांची भेट घेतली. देशामध्ये लोकशाहीची हत्या होत असल्याचे चित्र दिसत आहे. लोकशाही वाचवण्यासाठी सर्व विरोधी पक्षांनी एकत्र आले पाहिजे. विरोधकांना एकत्र करण्याच्यादृष्टीने नितीश कुमार प्रयत्न करत आहेत. मी नितीश कुमार आणि तेजस्वी यादव यांचे स्वागत करतो, असे उद्धव ठाकरे यांनी म्हटले.

## ...पण शिंदे-फडणवीसांनी एकच मुद्दा लावून धरला, ठाकरेंची उडवली खिल्ली

✔ सुराज्य/मुंबई

सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांच्या अधिकारकक्षेत हस्तक्षेप करण्यास नकार दिल्याने कायदेशीररित्या पूर्णपणे सुरक्षित झालेल्या शिंदे-फडणवीस सरकारच्या गोटात सध्या आनंदाचे वातावरण आहे. सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्ष, राज्यपाल यांच्या भूमिकेविषयी अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले असले तरी शिंदे-फडणवीस सरकारच्या स्थैर्याला धोका निर्माण होईल, असा कोणताही निकाल दिला नाही. याच मुद्द्यावर बोट ठेवत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईतील आपल्या पत्रकार परिषदेत सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आमच्याच बाजूने कसा आहे, हे पटवून देण्याचा पुरेपूर प्रयत्न केला.



या पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटले की, मी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करतो. लोकशाहीमध्ये बहुमताला महत्व आहे, हे नेहमी सांगत आलोय. आज कोर्टाने घटनाबाह्य सरकार म्हणणाऱ्यांना कालबाह्य केललं आहे. आम्ही जनमताचा आदर करत भाजपसोबत सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेतला. निवडणूक आयोगाने शिवसेना पक्ष म्हणून आम्हाला मान्यता दिली. काहीजण पराभवाचे फटाके फोडतायत, असा टोला एकनाथ शिंदे यांनी ठाकरेंना लगावला. माजी मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला कारण त्यांना माहिती होतं की, सरकार अल्पमतात आले आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय लोकशाहीला धरून आहे. आम्ही जे सरकार स्थापन केलंय ते पूर्ण कायदेशीररित्या केलं आहे, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले आहे.

उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयाने नोंदवलेल्या निरीक्षणांचा हवाला देत एकनाथ शिंदे यांनी नैतिकतेच्या मुद्द्यावरुन मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी केली होती. यावरुन देवेंद्र फडणवीस यांनी ठाकरेंना फटकारले. ज्यांनी खुर्चीसाठी भाजपाला दगा दिला तेव्हा नैतिकता कुठे गेली होती? नैतिकतेच्या गोष्टी ठाकरेंनी करू नये, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाबद्दल आम्ही समाधानी आहोत. हा निश्चितपणे लोकशाहीचा आणि लोकमताचा आज विजय झालेला आहे. कोर्टाकडून महाविकास आघाडीच्या मनसुब्यांवर पाणी फेरले गेले. उद्धव ठाकरेंना आता पुन्हा मुख्यमंत्री होता येणार नाही. १०व्या सूचीप्रमाणे राजकिय पक्ष कोणता आहे हे ठरविण्याचे अधिकार विधानसभाध्यक्षांना मिळाले आहेत. त्यामुळे आता हे सरकार संवैधानिक आणि पूर्ण कायदेशीर आहे, असे देवेंद्र फडणवीस यांनी ठणकावून सांगितले.

## उद्धव ठाकरेंनी राजीनामा दिला नसता तर....

✔ सुराज्य/मुंबई

शिवसेनेने महाविकास आघाडीमधून बाहेर पडून भाजपसोबत युती करीत नवे सरकार स्थापन करावे, हा आपला आग्रह मान्य होत नसल्याचे पाहून शिवसेना नेते व नगरविकासमंत्री एकनाथ शिंदे यांनी अचानक बंड केल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राजीनामा दिला नसता तर आज सर्वोच्च न्यायालयाचा निकाल वेगळा असता.

कारण ठाकरेंना बहुमत सिध्द करण्याचे निर्देश राज्यपालांनी देणे हे न्याय्य नव्हते. कारण ठाकरेंनी सभागृहाचा विश्वास गमावल्याचा निष्कर्ष काढता येईल, असे राज्यपालांसमोर काहीच नव्हते. मात्र, आता तेव्हाची पूर्वस्थिती पुन्हा निर्माण केली जाऊ शकत नाही. कारण ठाकरेंनी सभागृहात विश्वासदर्शक ठरावाला सामोरे न जाता राजीनामा दिला. त्यामुळे नंतर राज्यपालांनी भाजपच्या समर्थनावरून एकनाथ शिंदे यांना बहुमत सिद्ध करण्यास पाचारण करणे न्याय्य ठरते', असे महत्त्वाचे निरीक्षण घटनापीठाने आपल्या निकालात नोंदवले.

सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या नेतृत्वाखाली न्यायमूर्ती एम.आर.शाह, न्यायमूर्ती कृष्ण मुरारी, न्यायमूर्ती हिमा कोहली व न्यायमूर्ती पी.एस. नरसिंहा यांचा समावेश असलेल्या घटनापीठाच्या या निर्णयात राज्यपाल भगतसिंह कोश्यारी व विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या बेकायदा वर्तणुकीबाबत ताशेरे ओढण्यात आले आहेत. मात्र, ठाकरे यांच्या राजीनाम्यामुळे एकंदरीत निकालाचा सध्याच्या एकनाथ शिंदे सरकारच्या अस्तित्वावर कोणताही परिणाम झालेला नाही.

सरकारने सभागृहाचा विश्वास गमावला आहे की नाही, याचा राज्यपालांनी आपला विवेक वापरून साकल्याने विचार करायला हवा होता. जेव्हा लोकशाही पद्धतीने व कायद्याने सरकार अस्तित्वात आलेले असते तेव्हा त्या सरकारवर सभागृहाचा विश्वास असल्याचे गृहितक असते. ते गृहितक मोडण्यासाठी ठोस वस्तुनिष्ठ आधार आवश्यक असतो. पक्षांतर्गत दुफळीवर तोडगा काढण्यासाठी विश्वासदर्शक ठराव पद्धतीचा वापर केला जाऊ शकत नाही. राज्यपाल हे घटनात्मक पद आहे. त्यांना घटनात्मक अधिकार असतात.

राज्यघटनेने व कायद्याने जे अधिकार दिलेले नाहीत त्यांचा ते वापर करू शकत नाहीत. राज्यघटना किंवा कोणताही कायदा हा राज्यपालांना एखाद्या पक्षातील अंतर्गत दुफळीवर तोडगा काढण्यासाठी मार्ग देण्याचा अधिकार देत नाही. पक्षांतर्गत किंवा पक्षांमधील वाद मिटवण्याच्या हेतूने संबंधित राजकिय क्षेत्रात व डावपेचांत प्रवेश करण्याचा किंवा अगदी छोट्यात छोटी भूमिकाही निभावण्याचा अधिकार राज्यघटना राज्यपालांना देत नाही', अशा शब्दांत घटनापीठाने ताशेरे ओढले आहेत.

### निकालात राज्यपालांच्या वर्तणुकीवर ताशेरे


राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी या प्रकरणात आपल्या विशेषाधिकाराचा बेकायदा वापर केला. शिंदे गटातील ३४ सदस्यांनी स्वाक्षरी केलेल्या पत्रात आघाडी सरकारविषयी असमाधान व्यक्त केले असले तरी सरकारमधून बाहेर पडण्याचा इरादा नमूद केला नव्हता. देवेंद्र फडणवीस आणि सात अपक्ष आमदारांनी राज्यपालांना पत्र लिहिले, मात्र कोणत्याही विरोधी पक्षाने आघाडी सरकारविरोधात अविश्वासाचा प्रस्ताव दिला नव्हता. परिणामी आघाडी सरकारने विश्वास गमावला आहे की नाही, हे राज्यपालांनी आधी तपासायला हवे होते. राज्यपालांनी शिवसेनेतून बाहेर पडलेल्या आमदारांच्या ज्या ठरावाचा आधार घेतला त्यातही ते आमदार आघाडी सरकारमधून बाहेर पडू इच्छित असल्याचे म्हटले नव्हते. त्यामुळे सरकारला बहुमत सिद्ध करण्यास सांगण्यासाठी राज्यपालांसमोर वस्तुनिष्ठ असे काहीच नव्हते.

### विधानसभाध्यक्षांच्या भूमिकेचाही समाचार

शिवसेनेत दोन गट पडल्याचे विधानसभाध्यक्ष राहुल नार्वेकर यांना ३ जुलै रोजी कळले होते. कारण मुख्य प्रतोदपदी नेमणुकीचे दोन ठराव होते. एकनाथ शिंदे गटाने भरत गोगावले यांची मुख्य प्रतोदपदी नेमणूक केल्याचा ठराव आल्यानंतर, शिवसेना पक्षाची मान्यता गोगावले यांच्या नियुक्तीला आहे की सुनील प्रभू यांच्या, हे अध्यक्षांनी तपासले नाही. अशा वादाच्या वेळी त्यांनी नियमाप्रमाणे स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक होते. अध्यक्षांनी पक्षाची मान्यता असलेली नियुक्तीच ग्राह्य धरायला हवी. गोगावले यांची विधिमंडळ पक्षाच्या एका गटाने केलेल्या नियुक्तीला पक्षाची मान्यता नव्हती. त्यामुळे गोगावलेंच्या नियुक्तीला विधानसभाध्यक्षांनी दिलेली मान्यता ही बेकायदा आहे', असे नमूद करत अध्यक्षांच्या भूमिकेचाही घटनापीठाने निकालात समाचार घेतला आहे.

## राज्यपालांचे सर्व निर्णय चुकीचे; सर्वोच्च न्यायालयाचे मोठे निरीक्षण

✔ सुराज्य/मुंबई



- राज्यपालांनी बहुमत चाचणीसाठी अधिवेशन बोलवायला नको होतं.
- राज्यपालांनी घटनेच्या चौकटीत राहून काम करणं आवश्यक.
- राज्यपालांची भूमिका योग्य की अयोग्य?

राज्यपालांचे सर्व निर्णय चुकीचे आहेत. भरत गोगावलेंची प्रतोदपदी केलेली नियुक्ती बेकायदेशीर आहे, असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्राच्या संत्तासंघर्षांच्या निकालात शिंदे-भाजप सरकारला जोरदार धक्का दिला. तसचं, सत्तासंघर्षाचं प्रकरण ७ न्यायमूर्तींच्या घटनापीठाकडे सोपवले.

२१ जून रोजी राज्यपालांना दिलेल्या पत्रामध्ये आमदारांची नाराजी दिसली असली तरी त्यांना सरकारचा पाठिंबा काढायचा आहे, असं दिसून आलं नाही. पण राज्यपालांनी सांगितलं की, आमदारांनी सरकारमधून बाहेर पडण्याची इच्छा दर्शवली.

त्याविरोधात सबळ पुरावे असायला हवेत. बहुमत चाचणीचा वापर पक्षांतर्गत वाद मिटवण्यासाठी होऊ शकत नाही. पक्षांतर्गत वाद पक्षाच्या घटनेद्वारे किंवा पक्षाच्या मतानुसार सोडवायला हवेत. पक्षानं सरकारला पाठिंबा न देणं आणि पक्षातील एका गटानं पाठिंबा न देणं यात फरक आहे. राज्यपालांनी राज्यघटनेतील अधिकारांच्या आत राहूनच निर्णय घ्यायला हवेत.

### सर्वोच्च न्यायालयाचे बोल

राज्यपालांचे सर्व निर्णय चुकल्याचे सर्वोच्च न्यायालयाने सुनावले आहे. सरन्यायाधीश डी.वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच न्यायमूर्तींच्या घटनापीठाने १६ आमदारांच्या अपात्रतेविषयीच्या निकालाचे आज, ११ मे रोजी वाचन केले. त्यात राज्यरपालांच्या भूमिकेचा खरपूस समाचार घेण्यात आला. राज्यपालांची भूमिका सर्वोच्च न्यायासलयाने चांगलीच कानउघाडणी केली आहे. न्यायालयाने राज्यपालांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले.

### राज्यापालांचा हा अधिकारच नाही

राज्यपालांनी कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा देणं हे चुकीचं आहे. राज्यपालांनी बहुमत चाचणी बोलावायला नको होती. कारण राज्यपालांकडे त्यावेळी बहुमत चाचणीसाठीचे पुरेसे कारण नव्हते, अशी कानउघाडणी सर्वोच्च न्यायालयाने केली.

## मी अध्यक्ष,मी ठरवणार पक्ष कोणाचा आणि व्हीप कोणाचा : नार्वेकर

✔ नवी दिल्ली

**१६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय घ्यायला सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांना सांगितले आहे. मी अध्यक्ष आहे. त्यामुळे मी ठरवणार पक्ष कोणाचा आणि व्हीप कोणाचा लागू होणार, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्पष्ट केले.**

विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांनी १६ आमदारांना अपात्र ठरवले आहे. त्यावेळी अध्यक्षपद रिक्त होते. त्यामुळे उपाध्यक्ष या नात्याने झिरवाळ यांनी तसा निर्णय घेतला आहे. नियमानुसार अध्यक्ष नसताना उपाध्यक्ष निर्णय घेतो. अध्यक्ष आणि उपाध्यक्ष नसेल तर विधानसभा सदस्य एकाची निवड करतात आणि त्याला निर्णय घेण्याचे अधिकार देतात. मात्र आता मी अध्यक्ष आहे. त्यामुळेच मी निर्णय घेणार, असे नार्वेकर यांनी सांगितले.



नार्वेकर म्हणाले, व्हीप हा राजकिय पक्षाचा लागू होतो. विधानसभेतील सदस्य व्हीप जारी करु शकत नाही हे सर्व तपासूनच निर्णय घ्यावा, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितले आहे. परिणामी सर्व बाजू तपासूनच निर्णय घेतला जाईल. तसेच कोणाचा व्हीप ग्राह्य धरावा आणि कोणाचा ग्राह्य धरु नये, असे सर्वोच्च न्यायालयाने सांगितलेले नाही. मला सर्व तपासूनच निर्णय घ्यावा लागेल.

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षाचा निकाल गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाने दिला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदारांच्या अपात्रेतवर विधानसभा अध्यक्षांनी निर्णय घ्यावा, असे आदेशही न्यायालयाने दिले. त्यावर प्रतिक्रिया देताना नार्वेकर यांनी आपली भूमिका स्पष्ट केली.

या निकालात न्यायालयाने तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यावर ताशेरे ओढले. राज्यपालांनी कोणत्याही राजकिय पक्षाला पाठिंबा देणं हे चुकिचं आहे. राज्यपालांनी बहुमत चाचणी बोलावायला नको होती. कारण राज्यपालांकडे त्यावेळी बहुमत चाचणीसाठीचे पुरेसे कारण नव्हते, अशी कानउघाडणी सर्वोच्च न्यायालयाने केली. २१ जून २०२२ रोजी राज्यपालांना दिलेल्या पत्रामध्ये आमदारांची नाराजी दिसली असली तरी त्यांना सरकारचा पाठिंबा काढायचा आहे, असं दिसून आलं नाही. पण राज्यपालांनी सांगितलं की, आमदारांनी सरकारमधून बाहेर पडण्याची इच्छा दर्शवली.

त्याविरोधात सबळ पुरावे असायला हवेत. बहुमत चाचणीचा वापर पक्षांतर्गत वाद मिटवण्यासाठी होऊ शकत नाही. पक्षांतर्गत वाद पक्षाच्या घटनेद्वारे किंवा पक्षाच्या मतानुसार सोडवायला हवेत. पक्षानं सरकारला पाठिंबा न देणं आणि पक्षातील एका गटानं पाठिंबा न देणं यात फरक आहे. राज्यपालांनी राज्यघटनेतील अधिकारांच्या आत राहूनच निर्णय घ्यायला हवेत, असे न्यायालयाने फटकारले होते.

# ‘अनगर’चा बाळ मोहोळचे राजे



इतनी नफरत की निगाही से मत देख मुझे,
मेरा अंदाज दुनिया से निराला है,
मेरे गुरु ने कहा है बहुत जल्द,
मेरा वक्त बदलने वाला है!

‘साजन चले ससुराल’ चित्रपटाच्या माध्यमातून अभिनेता गोविंदा यांच्या मुखातून आलेला हा संवाद खूप काही आशावाद जागवून जातो. ‘बहुत जल्द वक्त बदलने वाला है’ या ओळी त्यांचेच कट्टर फॅन असणाऱ्या बाळराजे यांना तितक्याच चपलखपणे बसतात. ‘येथे आमदार बनवून मिळेल’ अशा आशयाचा अदृश्य बोर्ड ज्या अनगरच्या वाड्यावर असतो. त्याच वाड्यातील कालपर्यंतचा ‘बाळ’ आता उद्या मोहोळचा ‘राजे’ होण्यासाठी जनमानसात सक्रिय झालेला आहे. लोकनेते बाबुराव पाटील, माजी आमदार राजन पाटील याच घरातील तिसरी पिढी आता लोकसेवेसाठी अग्रेसर होऊन पुढे आली आहे. अशा बाळराजे यांचा आज वाढदिवस. त्यानिमित्त बाळराजे यांच्या विविधांगी स्वभाववैशिष्ट्यांचा उलगडा करणारी विशेष मुलाखत सुराज्य टीमने त्यांच्या निवासस्थानी घेतली. त्याच मुलाखतीतून अनप्लग्ड बाळराजे आम्ही या विशेष पानाच्या माध्यमातून आपणांसमोर मांडत आहोत.

## बहुत जल्द वक्त बदलने वाला है!



### आजोबाकडून धाडस मिळाले

धाडस ही सगळ्यात महत्त्वाची गोष्ट आजोबांकडून मिळाली. कितीही संकटे आली तरी खचायचे नाही. संकटे पूर्वीही आली आणि भविष्यातही येणार, अशा सर्व संकटांना समोर जाऊन तोंड देण्याचे धाडस आजोबांकडून मिळाले आहे.

### इतर क्षेत्रात वारसा चालतो मग राजकारणात का नको?

डॉक्टरांचा मुलगा डॉक्टर झालेला चालतो. इंजिनियरचा मुलगा इंजिनियर चालतो. वकिलाचा मुलगा वकील चालतो मग राजकारण्यांचा मुलगा पुढे राजकारणात आला तर का नाही आणि राजकारण हे असे क्षेत्र आहे या क्षेत्रात मते किंवा लोकांचे हृदय जिंकता येत नाहीत. त्यासाठी मिसळून कामच करावे लागते. जर एखाद्या व्यक्तीमध्ये नसल्यास केवळ वारसा सांगून लोक स्वीकारत नाहीत. वारसाने संधी मिळाली तरी कर्तृत्व हे प्रत्येकाला सिद्ध त्यामुळे राजकारणातील वारसा यावर होणारी टीका असल्याचे बाळराजे तितक्याच स्पष्ट बोलत होते.




### सध्याच्या राजकारणाची पातळी घसरली

तीन पिढ्यांच्या राजकारणामध्ये राजकारणातील परिस्थिती मोठ्या प्रमाणात बदलली आहे. आजोबांच्या काळात तत्व होती, शब्दांना किंमत होती. त्यामुळे आजोबांच्या काळातील राजकारणाची दिशा वेगळी होती. त्यानंतर वडिलांच्या काळातील राजकारणात पुढाऱ्यांची संख्या वाढली. अपेक्षा वाढल्या आणि राजकारणात बरेचसे बदल घडले. सध्याच्या राजकारणात प्रचंड तफावत झाली आहे. कार्यकर्ते सगळे नेते राहिले आहेत. विश्वास ठेवायचा कोणावर ? हा सध्याच्या राजकारणात महत्त्वाचा प्रश्न पडला आहे. राजकारणाला दर्जाच राहिलेला नाही. आज या पक्षात, उद्या तो कोणत्या पक्षात राहील? याचा काही नेम राहिलेला नाही. त्यामुळे राजकारणात सर्वत्र अविश्वासाचे वातावरण झाले आहे.



### वडिलांकडून वक्तशिरपणा शिकलो

प्रपंच कसा करायचा? आर्थिक दृष्ट्या सक्षम कसे व्हायचे ? उद्योग कसे वाढवायचे? याबरोबरच राजकारणातून पैसा मिळवायचा नसतो तर पैशासाठी कधीही राजकारण करायचे नाही. या गोष्टी वडिलांवरून शिकल्या आहेत. राजकारणात वेळेला फार महत्त्व आहे आणि वक्तशीरपणा हा सर्वांत महत्त्वाचा गुण वडिलांकडून शिकता आले.



### असा आहे दिनक्रम

सकाळी पावणे सहा वाजता उठून त्यानंतर दीड तास जीम. त्यांनतर फ्रेश होऊन नाश्ता उरकून साडेआठ वाजता कारखाना कार्यस्थळावर लोकांची कामे करण्यासाठी हजर. दुपारी दीड वाजेपर्यंत येथील कामे आटपून चार पाच वाजेपर्यंत घरी विश्रांती आणि नंतर पाच वाजता पुन्हा जनसेवेसाठी कार्यरत राहून रात्री साडेआठ वाजेपर्यंत घर गाठणे. रात्री नऊ वाजता सर्व कुटुंब एकत्र बसून एकाच डायनिंग टेबलवर जेवण करण्याची परंपरा कायम जपली आहे.

### विरोधकांनी केली रागीट इमेज



बाळराजे रागीट आहेत. ते अमुक आहेत ते तमुक आहेत, अशा पद्धतीच्या अफवा पसरवून विरोधकांनी इमेज डॅमेज करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामुळे अनगरला एखादा अधिकारी बदलून यायचा असल्यास पूर्वी तयार व्हायचा नाही आणि एकदा तो अधिकारी आल्यानंतर आमच्या सोबत रुळल्यानंतर तो पुन्हा जायला तयार होत नाही. हा विरोधकांनी केलेल्या रागीट इमेजचा परिणाम आहे.

### आजोबांचा चेहरा देतो पॉझिटिव्ह एनर्जी



आजोबा बाबुराव पाटील यांचा चेहराच आपणाला पॉझिटिव्ह एनर्जी देतो. त्यामुळे कारखान्यात व वेगवेगळ्या ठिकाणी त्यांचे फोटोग्राफ लावलेले आहेत. त्यातूनच आपणाला पॉझिटिव्ह एनर्जी मिळते. त्यामुळे इतर तरुणांप्रमाणे पॉझिटिव्ह एनर्जीसाठी कोणतीही व्हिडिओ पाहण्याची गरज भासत नाही.

### आवड आपली-आपली

ड्रायव्हिंग, जिम करणे, फुटबॉल खेळणे ( स्टेट लेवलचा खेळाडू) आणि ९० च्या दशकातील गाणी ऐकणे.





### पक्ष बदलाबाबत कसं? मालक म्हणतील तसं!

राष्ट्रवादी काँग्रेससोबत मालक सुरुवातीपासून आहेत. जुन्या काळापासून पक्षाचे कार्य करत होतो. सध्याही करत आहोत. भविष्यात बघू. मालक म्हणतील तसं निर्णय घेऊन कार्य करणार आहे. असे सांगत त्यांनी पक्षांतराच्या प्रश्नावर मालक म्हणतील तसं असे सुरक्षित उत्तर देणे पसंत केले.

### राजकीय संघर्षाची सुरुवात



२००७ मध्ये ३१ मार्च रोजी ग्रॅज्युएशनच्या लास्ट इयरचा पेपर दिला. त्यानंतर पुढे पाचच दिवसात पाच एप्रिल रोजी ३०२ गुन्ह्यांमध्ये खोटा गुन्हा दाखल करण्यात आला. तेव्हापासूनच आपल्या राजकीय संघर्षाचा प्रवास सुरू झाल्याचे बाळराजे म्हणतात. या राजकीय संघर्षाला जशास तसे उत्तर देण्याचे काम त्यांनी २००९ मध्ये केले. जिल्हा परिषदेमध्ये राज्यात सर्वाधिक मते मिळवून जिल्हा परिषदेचा उपाध्यक्ष होण्याचा मान त्यांनी मिळवून आपल्या विरोधकांना कृतीतून उत्तर देण्याची काम केले.

### चेअरमन पदाचा ठसा


लोकनेते बाबुराव पाटील साखर कारखान्यात चेअरमन पद स्वीकारल्यानंतर अनेक विकासकामे करून तिथेही आपल्या कार्याचा ठसा उमटविण्यात बाळराजे यशस्वी झाले आहेत. साडेतीन हजार में. टन असलेली कारखान्याची क्षमता वाढवून ती साडेपाच हजार में. टन पर्यंत वाढवली आहे. वीज निर्मिती ८ मेघावॅट वरून १७ मेघावॅट पर्यंत वाढवण्यात आली आहे.

### तरूण पाठिशी

मोहोळ तालुक्यातील ७० टक्के तरुण हा आपल्या पाठीशी आहे. त्यामुळेच कृषी उत्पन्न बाजार समिती असो अथवा कारखान्यातील डायरेक्टर असो यामध्ये तरुणांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढवण्यात आली आहे. तरुणांना मोठ्या कार्य करण्याची संधी दिली जात आहे.



### शिक्षकांच्या ड्रेसकोडचा विषय गाजला



सोलापूर जिल्हा परिषदेत उपाध्यक्ष झाल्यानंतर सर्वात तरुण म्हणजे २५ व्या वर्षी उपाध्यक्ष होण्याचा मान त्यांनी मिळवला. यावेळी अनेक धाडसी आणि सामाजिक निर्णय घेण्याचे काम यावेळी करत असताना जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांना ड्रेस कोड सुरू करण्याचा त्यांचा निर्णय सर्वाधिक गाजला.



### दु:खाचा दिवस

आजी सोबत आपले फार जमायचे. विशेष बाँडींग होते. आजी लक्ष्मीबाई पाटील यांचे निधन झालेला दिवस आपल्या आयुष्यातील सर्वात मोठा दु:खाचा दिवस आहे.

### आनंदाचा दिवस

खोट्या ३०२ च्या खटल्यातून १७ महिन्यानंतर ५ ऑक्टोबर रोजी सकाळी निर्दोष सुटका झालेला दिवस हा आयुष्यातील सर्वांत आनंदाचा दिवस आहे.



## Impression

### ‘सुराज्य’ वाचून राऊतांचा कॉल

पायलट ऋतुजा पाटील यांच्याबाबत ‘सुराज्य’ने केलेले विशेष पान हे नागपूर येथील माजी मंत्री नितीन राऊत यांच्यापर्यंत पोहोचले. त्यांच्या नातीला देखील परदेशातून पायलट व्हायचे आहे. त्याची माहिती त्यांनी डिजीटल सुराज्य वाचून राजन पाटील यांची कन्या ऋतुजा पाटील यांच्याकडून अधिक माहिती मिळवली. ‘सुराज्य’च्या विशेष मुलाखतीचा असा देखील फायदा झाल्याचे बाळराजे पाटील यांनी विशेष आवर्जून सांगितले.


विकासाच्या टेकऑफसाठी विमानसेवेचे लँडिंग आवश्यक

सुराज्य शुक्रवार, दि.१६ डिसेंबर २०२२

# राजनकन्या ऋतुजा पाटीलची हवाई सफर

विमानसेवा सुरू नसलेल्या सोलापूर जिल्ह्यातील एक कन्या पायलटचे स्वप्न पाहू शकते, हीच मोठी पॉझिटिव्ह बाब आहे. केवळ स्वप्न न पाहता ते स्वप्न युके आणि कॅनडातून शिक्षण पूर्ण करून साकारण्याची किमया ‘राजन कन्या’ अर्थातच ऋतुजा राजन पाटीलने करून दाखवली आहे. फॉरेनच्या या पायलटच्या हवाई सफरीचा प्रवास तितकाच रंजक आणि प्रेरणादायक आहे, हे त्यांच्याशी अनगरवरच्या बंगल्यात झालेल्या गप्पांमधून उलगडत गेला. मोहोळच्या राजकारणातील एकखा असणारे माजी आमदार राजन पाटील यांच्या बंगल्यावरील गप्पांमध्ये राजकीय चर्चांना बायपास करत केवळ पायलटच्या नजरेतून सोलापूर शहराच्या विकासावर टाकलेला दृष्टिक्षेप आणि एक कन्या पायलट म्हणून आकाशात भरारी घेताना आलेले अनुभव या साऱ्या गोष्टी आजच्या नव्या पिढीला भरारी घेण्यासाठी गरजेच्या वाटतात.

कमी वयात जास्त देशांची सफर

राजकारणाच्या ‘रनवे’वर नो ‘फ्लाईंग’

### राजकारणात नशिबाला फार महत्व



राजकारणात आपणाला वाटेल तसे राजकारण कधीही होत नसते. त्यासाठी योग्य वेळ यावी लागते. आमदार निवडून आणणारे घर आमचे असले तरी आम्हाला आमदार होता येत नाही. अशाच पद्धतीने राजकारणात कधी काय घडेल? सांगता येत नाही. राजकारणात नशिबाला फार महत्त्व आहे.



बाळराजे पाटील यांचा सुराज्यच्या वतीने सत्कार करताना कार्यकारी संपादक शंकर जाधव, व्यवस्थापक पुरूषोत्तम मित्रगोत्री, वरिष्ठ उपसंपादक विजय गायकवाड, पी.आर. श्रीकांत बोरगांवकर.

## राजकीय गप्पा... गल्लीपासून दिल्लीपर्यंत

**काँग्रेस :** भारत जोडो यात्रेच्या माध्यमातून राहुल गांधी यांनी काँग्रेसमध्ये सकारात्मक वातावरण तयार केले आहे. या गोष्टीचा त्यांना आज ना उद्या निश्चित फायदा होणार आहे.

**राष्ट्रवादी काँग्रेस :** वाढत्या वयामुळे शरद पवारांनी नवा अध्यक्ष निवडण्याचा विचार केला असणार. नव्या नेतृत्वाकडे सूत्रे दिल्यास त्यांना वयोमानानुसार फिरण्यास येणाऱ्या अडचणी सुटतील त्यासाठी हा निर्णय घेतला असावा.

**शिवसेना :** शिवसेनेचे संघटन हे मजबूत आहे. गाव पातळीवर हे संघटन पोहोचले आहे. त्यामुळे अंतर्गत बंडाळीचा उद्धव ठाकरे यांना भविष्यातील राजकारणात फारसा फरक पडेल, असे वाटत नाही.

**भाजप :** देवेंद्र फडणवीस यांचा राजकारणातील दांडगा अनुभव आहे. त्यांच्या कामाची शैली ही अजित पवार यांच्या पद्धतीनेच ऑन दि स्पॉट निर्णय देणारी असल्याचे ऐकिवात आहे. त्यामुळे देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यक्षेलीकडे तरुण आकर्षित होत असल्याचे ऐकायला मिळते.

लेखन संपादन : विजय गायकवाड